- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,५८,७०० /-
✔ २२ कॅरेट : १,५६,३५० /-
✔ चांदी : २,७८,३००/-

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर
संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 Mail Id : sinhvanivrutta@gmail.com दिनांक : रविवार, १८ ऑक्टोबर २०२६ Epaper : epaper.sinhvani.com पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३०९ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

दुर्गा पूजा मंडपात चेंगराचेंगरी, २० जणांचा मृत्यू, तर अनेकजण जखमी

कोलकातामधील धक्कादायक घटना



कोलकातामध्ये धक्कादायक घटना घडली आहे. गर्दीमुळं चोरबागान सर्वजनिक दुर्गा पूजा मंडपात चेंगराचेंगरी झाल्याची घटना घडली आहे. या दुर्घटनेत २० जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली आहे. तर ४५ जण जखमी झाले आहेत. या घटनेत जखमी झालेल्यांना वाचवून उपचारासाठी कलकत्ता मेडिकल कॉलेज रुग्णालयात दाखल करण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, पूजा आयोजकांनी तात्काळ कारवाई करून परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आणि पीडितांना मदत पुरवण्यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. जखमींची संख्या आणि इमारत कोसळण्याचे नेमके कारण अद्याप कळलेले नाही.

घटनास्थळी उपस्थित असलेल्या एका प्रत्यक्षदर्शीने सांगितले की, अनेक लोक बेशुद्ध पडले. काहींना मोटारसायकलवरून उचलून नेले जात होते. "मी हे माझ्या आजूबाजूला घडताना पाहिले. जेव्हा लोक बेशुद्ध पडले, तेव्हा त्यांना मोटारसायकलवरून उचलून नेण्यात आले. हे घडले आणि तिथे प्रचंड गर्दी होती. एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, पाऊस सुरू होताच, चोरबागान दुर्गा पूजा मंडपाबाहेर थांबलेली गर्दी पुढे धावली, ज्यामुळे काही लोक रस्त्यावर पडले आणि चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती निर्माण झाली.

ममता बॅनर्जी यांनी तीव्र दु:ख व्यक्त केले

पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी इन्स्टाग्रामवर पोस्ट करत म्हटले, "चोरबागान पूजा मंडपात झालेल्या चेंगराचेंगरीबद्दल ऐकून मला तीव्र धक्का बसला आहे आणि दु:ख झाले आहे. मी देवी दुर्गेकडे प्रार्थना करते की सर्व जखमी लवकर बरे व्हावेत. या कठीण काळात त्यांच्या कुटुंबीयांना शक्ती आणि धैर्य मिळो.

टीएमसी नेते कुणाल घोष म्हणाले, की आम्ही परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत टीएमसी नेते कुणाल घोष यांनी सांगितले की, उत्तर कोलकात्यातील चोर बागान पूजेच्या ठिकाणी एक दुर्दैवी घटना घडली आहे. तेथे उपस्थित असलेल्या भाविकांना वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये हलवण्यात येत आहे. ही घटना कशी आणि का घडली यावर आपण नंतर चर्चा करू शकतो, पण जीव वाचवणे हे आमचे प्राधान्य आहे. आम्ही पोलीस प्रशासनाला आवाहन करतो आणि आमचे कार्यकर्ते पूर्ण सहकार्य करत आहेत. रुग्णालयांमधील वैद्यकीय कर्मचाऱ्यांची संख्या वाढवली पाहिजे. आम्ही पोलिसांना सहकार्य करत आहोत. मंडपाच्या आतही बचावकार्य सुरू आहे. आम्ही परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत. ही दुर्दैवी घटना पूजदरम्यान घडली.

थोडक्यात

दिवाळीचा शिधा दसऱ्याच्यादिवशी रवाना करणार

मुंबई : दिवाळीचा शिधा हा दसऱ्याच्या दिवशी रवाना होईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. डोंबिवलीतील खासदार श्रीकांत शिंदे फाउंडेशन आयोजित शारदीय नवरात्र उत्सवाला शिंदे यांनी भेट दिली. शिंदे यांच्या हस्ते देवीची आरती करण्यात आली. तसेच महाप्रसाद वाटप देखील करण्यात आलं. यावेळी शिवसेना नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे धनादेश स्वरूपात मदत सुपूर्द केली.

एकनाथ शिंदे म्हणाले की, शेतकऱ्यांची दिवाळी काळी होणार नाही याची जबाबदारी आम्ही घेतली आहे. आम्ही दिलेला शब्द पाळणार असून शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. त्यांनी पुढे सांगितले की, महाराष्ट्रावर मोठं दुष्काळाचं संकट असल्याचं भान ठेवून यंदा रास-दांडिया रद्द करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठीचा निधी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना देणार असल्याचे ते म्हणाले. त्यांनी सांगितले की, यंदाचा नवरात्रोत्सव अत्यंत साधेपणाने, धार्मिक आणि पारंपरिक वातावरणात साजरा करण्यात आला. सरकारसोबत नवरात्रोत्सव मंडळांचाही दुष्काळग्रस्तांना मदतीचा हात दिला आहे. श्रीकांत शिंदे यांनी सुरू केलेला उपक्रम स्तुत्य असल्याचं सांगत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्रीकांत शिंदे यांचं अभिनंदन केलं.

तत्पूर्वी, पुण्यात बोलताना शिंदे म्हणाले की, शेतकरी यावर्षी अडचणीत आहे. शेतकऱ्याच्या बांधावर आम्ही गेलो, त्यांचं म्हणणं ऐकून घेतलं आणि दुष्काळ जाहीर केला.

अकार्यक्षम मंत्र्यांना मिळणार डच्चू?







वृत्तसंस्था, मुंबई

महाराष्ट्राच्या राजकीय वतुर्ळातून एक मोठी बातमी समोर आली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिर्दिंच्या शिवसेनेत मोठे फेरबदल होण्याची शक्यता आहे. हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर अकार्यक्षम मंत्र्यांच्या कामांवर एकनाथ शिंदे नाराज आहेत. अडीच वर्षांचा कार्यकाळ संपत आला असून लवकरच शिंदेसेनेतील अकार्यक्षम मंत्र्यांना डच्चू दिला जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे राजकीय वतुर्ळात आता चर्चांना उधाण आले आहे.

असे देखील सांगितले जात आहे की, तरुण आमदारांच्या गळ्यात मंत्रिपदाची माळ पडण्याची शक्यता आहे. तर काही राज्यमंत्र्यांना कॅबिनेटमंत्री पद देत त्यांची पदोन्नती केली जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. ज्या मंत्र्यांना डच्चू दिला जाणार आहे त्या यादीमध्ये संजय शिरसाट, संजय राठोड, दादा भुसे, गुलाबराव पाटील यांची नावं असल्याचे सांगितले जात आहे. राज्यमंत्रिपदी असलेले योगेश कदम, आशिष जयस्वाल या दोघांना राज्यमंत्रिपदावरून थेट कॅबिनेट मंत्रिपद मिळण्याची शक्यता आहे. तर काही नव्या आमदारांना देखील मंत्रिपद मिळण्याची शक्यता आहे.

दरम्यान, महाराष्ट्रातील शिंदेसेनेतील मंत्र्यांच्या कामगिरीवरून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाराज असल्याचे सांगितले जात आहे. एकनाथ शिंदे यांनी मंत्र्यांची बैठक बोलावून नाराजी व्यक्त केली. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी शिवसेनेच्या मंत्र्यांना कामकाजात सुधारणा करण्याची तंबी दिली. जनतेची कामं, मतदारसंघातील प्रश्न आणि पक्षसंघटनेच्या वाढीकडे लक्ष देण्याचे निर्देश त्यांनी दिल्याचे सांगितले जात आहे. यापूर्वीही कामगिरी सुधारली नाही तर मंत्रिपद गमवावे लागू शकते, असा इशारा शिर्दिनी दिल्याचे वृत्त आहे.

दुष्काळामुळे शेतकरी संकटात आहे. असे असताना शिंदेसेनेच्या मंत्र्यांना आपले मतदारसंघ सोडूशी वाटत नाही त्यामुळे एकनाथ शिंदे यांनी नाराजी व्यक्त करत या मंत्र्यांना तंबी दिली होती. राज्यात दुष्काळाची परिस्थिती असताना मंत्री जबाबदारी असलेल्या जिल्ह्यांचे दौरे का करत नाही? असा सवाल एकनाथ शिंदे यांनी बैठकीत केला होता. ज्या मंत्र्यांना ज्या जिल्ह्याची जबाबदारी दिली आहे त्या मंत्र्यांनी दुष्काळग्रस्त जिल्ह्यांचा दौरा करण्याचे आदेश शिर्दिनी दिले.

शेतकऱ्यांसह मजूरही दुबार संकटात!



वृत्तसंस्था, मुंबई

शेती हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आणि बांधकाम हा रोजगाराचा मोठा आधार आहे. मात्र, यंदाच्या दुष्काळाने या दोन्ही क्षेत्रांसमोर संकट उभे केले आहे. पावसाची तूट, खालावलेली भूजल पातळी आणि धरणांमधील मर्यादित पाणीसाठा यामुळे पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्याची वेळ आली आहे. त्याचाच परिणाम आता बांधकाम क्षेत्रावर होत आहेत.

दुष्काळाचे दशावतार आता केवळ शेतशिवारातच नाही, तर राज्याच्या अर्थव्यवस्थेतही दिसू लागले आहेत. पाण्याच्या टंचाईमुळे कुठे सिमेंट रस्त्यांची कामे थांबवली जात आहेत, तर कुठे बांधकामासाठी पिण्याच्या पाण्याच्या वापरावर बंदी घालण्यात आली. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान असलेल्या बांधकाम क्षेत्रापुढे आता नवे संकट उभे ठाकले आहे. बांधकामांची कामे मंदावली, तर त्याचा थेट परिणाम मजूर, गवंडी, सेंट्रिंग कामगार, ट्रकचालक, सिमेंट विक्रेते आणि या व्यवसायावर अवलंबून असलेल्या हजारो छोट्या व्यावसायिकांवर होऊ शकतो. आधी शेतीने रोजगार हिरावला आणि आता बांधकाम क्षेत्रालाही दुष्काळाची झळ बसू लागली, तर या मजुरांनी जगायचं कसं? असा प्रश्न साऱ्यांना सतावतो आहे. दुष्काळाच्या या नव्या आर्थिक संकटानं चिंतेत भर घातल्याचे चित्र आहे.

महाराष्ट्रातील दुष्काळाची तीव्रता

राज्यात ३५८ पैकी ३०५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर झालाय. त्यात राज्यातील सुमारे ८५ टक्के तालुके दुष्काळाच्या कक्षेत असून पावसाची तूट सुमारे १८ टक्के आहे. दुष्काळाची तीव्रता लक्षात घेता, राज्य सरकारने १६ ऑक्टोबरपासून शहरी आणि ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना किमान दहा टक्के पाणी कपात लागू करण्याचे निर्देश दिलेत.

नागपुरात रस्त्याचे काम थांबले

पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्यासोबतच बांधकामासाठी प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा वापर करण्यावर भर देण्यात आलाय. पुण्यात पिण्याच्या पाण्याचा बांधकामासाठी वापर करण्यास बंदी घालण्यात आली आहे. तर नागपुरात पाणीटंचाईमुळे सिमेंट रस्त्यांच्या पाचव्या टप्प्यातील काम थांबवण्यात आले आहेत. म्हणजेच दुष्काळाचा फटका आता प्रत्यक्ष बांधकामांच्या कामांपर्यंत पोहोचला आहे.

बांधकाम क्षेत्रावर दुष्काळाची कात्री

दरम्यान, राज्यात १६ ऑक्टोबरपासून किमान १०% पाणी कपातीचे निर्देश देण्यात आले आहे. यात पुण्यात बांधकामासाठी पिण्याच्या पाण्याच्या वापरावर बंदी घालण्यात आली. बांधकाम क्षेत्राचं महत्त्व केवळ इमारती उभ्या करण्यापुरतं मर्यादित नाही. सिमेंट, स्टील, वाळू, विटा, वाहतूक, हार्डवेअर आणि मजुरांची रोजीरोटी अशा अनेक व्यवसायांची अर्थव्यवस्था याच्याशी जोडलेली आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक सर्वेक्षणानुसार, २०२५-२६ मध्ये राज्याच्या बांधकाम क्षेत्राची वास्तविक वाढ ७.८ टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

वाघाचा महिलेवर हल्ला, पतीसमोरच पत्नीचा दुर्दैवी मृत्यू

धानशेतीत काम करताना हल्ला, पत्नीला वाचविण्याचा प्रयत्न ठरला अपयशी, पळसगाव वनक्षेत्रातील घटनेने परिसरात भीतीचे वातावरण

दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर-धनंजय पांडरे

दिनांक. १६/१०/२०२६ चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर तालुक्यात येत असलेल्या पळसगाव वनक्षेत्रात धानशेतीच्या कामासाठी गेलेल्या एका महिलेवर दबा धरून बसलेल्या वाघाने अचानक हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या हल्ल्यात उषा अंकुश गुरुनुले (वय ४५, रा. पळसगाव) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. पतीसमोरच पत्नीवर काळाने घाला घातल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

प्राप्त माहितीनुसार, उषा गुरुनुले या आपले पती अंकुश गुरुनुले यांच्यासोबत धान पिकाला पाणी देण्यासाठी जंगलालगत असलेल्या शेतात गेल्या होत्या. त्यांचे पती शेतातील डिझेल इंजिनजवळ पाण्याची व्यवस्था पाहण्यात व्यस्त होते, तर उषा या शेतात तण काढण्याचे काम करीत होत्या. याचदरम्यान दुपारी ३ ते ४ वाजेदरम्यान शेतात दबा धरून बसलेल्या वाघाने अचानक त्यांच्यावर जोरदार झडप घातली. वाघाने उषा यांना जबड्यात पकडले आणि फरफटत जंगलाच्या दिशेने नेण्यास सुरुवात केली. पत्नीवर अचानक झालेला हा जीवघेणा हल्ला पाहून पती अंकुश गुरुनुले यांनी तातडीने आरडाओरड केली. धावपळ करीत त्यांनी पत्नीला वाघाच्या तावडीतून वाचविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. मात्र, वाघाने उषा यांच्या मानेचा घातक चावा घेतल्याने त्यांचा घटनास्थळीच दुर्दैवी मृत्यू झाला.

या घटनेमुळे गुरुनुले कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला असून, पतीसमोरच पत्नीचा मृत्यू झाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीती आणि हळहळ व्यक्त केली जात आहे.

पळसगाव वनक्षेत्रात वाघाच्या हल्ल्याची घटना

प्राथमिक माहितीनुसार, पळसगाव वनक्षेत्रातील कक्ष क्रमांक ५५९, पीएफ १००० परिसरात ही घटना घडली. जंगलालगतच्या शेतांमध्ये शेतीची कामे करणाऱ्या शेतकरी आणि शेतमजुरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न या घटनेमुळे पुन्हा ऐरणीवर आला आहे.

वनविभागाने शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना कराव्यात!

जंगलालगतच्या शेतांमध्ये काम करणाऱ्या शेतकरी व शेतमजुरांना वन्यप्राण्यांच्या हल्ल्याचा धोका कायम असतो. या पार्श्वभूमीवर वनविभागाने घटनास्थळाची पाहणी करून परिसरात गस्त वाढवावी, नागरिकांना सतर्कतेचा इशारा द्यावा आणि आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात येत आहे.



वाघाच्या या हल्ल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, शेतात काम करताना नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा गंभीर बनला आहे.

बावनकुळे साहेब तुमच्या प्रॉपर्टीची चौकशी केली तर तुम्हाला विदेशात पळून जावं लागेल : हर्षवर्धन सपकाळ

वृत्तसंस्था, मुंबई

महसूलमंत्री व अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे काल अमरावतीत आले होते, तेव्हा त्यांनी शिक्षकांना धमकावलं तर एसआयटी चौकशी केली जाईल असं वक्तव्य केलं होतं. त्या वक्तव्यावर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी प्रतित्युत्तर देत टिका केली आहे. डॉक्टर पंजाबराव देशमुख यांनी शिक्षणाची कास धरुन बहुजन समाजाला शिकवलं आणि आपल्याला शिक्षणाच्या प्रवाहात आणलं. त्यांच्याच शिक्षण संस्थेमध्ये रक्कळ. हा संपूर्ण विदर्भाचा अपमान आहे. तो अपमान आपण सहन करायचा का? असा सवाल सपकाळ यांनी केला.



चंद्रशेखर बावनकुळे साहेब तुमच्या प्रॉपर्टीची चौकशी केली तर तुम्हाला विदेशात पळून जावं लागेल असा खोचक टोला देखील सपकाळांनी लगावला. विदेशात कोणत्या क्लब मध्ये जाऊन सुटकेस भरून भरून कोट्यवधी रुपये तुम्ही एका-दुरी खेळता. तो पैसा कुठून आला बावनकुळे साहेब असेही सपकाळ म्हणाले. हा जर प्रश्न विचारला तर तुमची नाचक्की काय तुम्हाला घाम फुटेल असेही सपकाळ म्हणाले. तुम्हाला लाज वाटली पाहिजे. शिवाजी शिक्षण संस्थेचे एसआयटी लावण्याची तुम्ही भाषा करता असेही ते म्हणाले.

चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलेल्या टीकेला हर्षवर्धन सपकाळ यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. आता हर्षवर्धन सपकाळ यांच्या टीकेला भाजप आता काय प्रत्युत्तर मिळणार हे पाहणं देखील महत्त्वाचं आहे.

संपादकीय लेखणीतून...

अन्न हे पूर्णब्रह्म

जागतिक अन्न दिन दरवर्षी १६ ऑक्टोबरला साजरा केला जातो, जो अन्न आणि कृषी संघटना- एफएओच्या स्थापनेच्या स्मरणार्थ आहे. सन १९४५ साली एफएओची स्थापना करण्यात आली आणि तेव्हापासून जागतिक अन्न दिनाचा उद्देश जगभरातील भुकेची समस्या कमी करणे, अन्नसुरक्षेची जनजागृती करणे, आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन देणे हा आहे. या दिवसाचे मुख्य ध्येय म्हणजे प्रत्येक व्यक्तीला पोषक आणि पुरेसे अन्न उपलब्ध व्हावे, याची खात्री करणे. जागतिक अन्न दिनाचे प्रत्येक वर्षी एक विशिष्ट थीम असते, जसे की शून्य भूक, शाश्वत शेती इत्यादी, ज्याद्वारे विविध समस्या आणि त्यावरील उपायांवर चर्चा केली जाते. या दिवशी विविध कार्यक्रम, जनजागृती मोहीम आणि चर्चा आयोजित केल्या जातात, ज्यात अन्न सुरक्षेची समस्या, कुपोषण, आणि अन्न उत्पादनातील असमानता यावर लक्ष केंद्रित केले जाते. जागतिक अन्न दिन हा एक महत्त्वाचा दिवस आहे, जो अन्न उत्पादन आणि वितरणाच्या क्षेत्रातील सुधारणांकडे लक्ष वेधते. "जागतिक अन्न दिन- वर्ल्ड फूड डे" हा दरवर्षी १६ ऑक्टोबर रोजी जगभरात साजरा केला जातो.

दिनांक १६ ऑक्टोबर १९४५ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटना- एफएओची स्थापना झाली. सन १९७९ मध्ये एफएओच्या परिषदेमध्ये हंगेरीचे माजी कृषीमंत्री डॉ. पल रोमानी यांनी हा दिवस साजरा करण्याची कल्पना मांडली. सन १९८१ पासून अधिकृतपणे दरवर्षी १६ ऑक्टोबर रोजी जागतिक अन्न दिन साजरा करण्यास सुरुवात झाली. जगभरातील वाढती उपासमारी, गरीबी आणि कुपोषण दूर करण्याबाबत लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे. प्रत्येक व्यक्तीला सुरक्षित, पौष्टिक आणि पुरेसे अन्न मिळावे यासाठी शाश्वत अन्न व्यवस्था निर्माण करणे. अन्नाची नासाडी थांबवणे आणि गरजूंना अन्न उपलब्ध करून देण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे.

संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटना स्थापनेच्या वर्धापन दिनानिमित्त दरवर्षी १६ ऑक्टोबर रोजी जागतिक अन्न दिन साजरा केला जातो. हा आंतरराष्ट्रीय दिवस अन्न सुरक्षा आणि पोषणाचे महत्त्व अधोरेखित करतो, तसेच भूक संपवण्याची आणि प्रत्येकाला सुरक्षित, पौष्टिक अन्न उपलब्ध होईल याची खात्री करण्याची आपली सामूहिक जबाबदारी स्पष्ट करतो. भूक, कुपोषण आणि अन्नाची नासाडी यांसारखी जागतिक आव्हाने कायम असताना जागतिक अन्न दिन एका निरोगी, भूकमुक्त जगासाठी जागरूकता निर्माण करण्यास आणि उपाययोजनांना प्रोत्साहन देण्यासाठी व्यक्ती, शाळा, समुदाय आणि सरकार यांना एकत्र आणतो. जागतिक अन्न दिनाची घोषणा सन १९७९ मध्ये एफएओ द्वारे, दि.१६ ऑक्टोबर १९४५ रोजी झालेल्या तिच्या स्थापनेच्या स्मरणार्थ करण्यात आली. भूक निर्मूलन, पोषण सुधारणा आणि शाश्वत अन्न प्रणालींना प्रोत्साहन देण्यासाठी आंतरराष्ट्रीय प्रयत्नांचे नेतृत्व करण्यास एफएओची स्थापना संयुक्त राष्ट्रांची एक विशेष संस्था म्हणून करण्यात आली. दुसऱ्या महायुद्धाच्या विनाशकारी परिणामांनंतर भूक निर्मूलन आणि अन्न सुरक्षेला पाठिंबा देण्यासाठी जागतिक सहकार्याच्या तातडीच्या गरजेला प्रतिसाद म्हणून जागतिक अन्न दिनाची स्थापना करण्यात आली. आज १५० हून अधिक देश हा दिवस साजरा करतात, ज्यामुळे तो अन्न आणि पोषणावरील सर्वात प्रमुख आंतरराष्ट्रीय जागरूकता कार्यक्रमांपैकी एक बनला आहे.

" पाणी जीवन आहे, पाणी अन्न आहे. कोणालाही मागे सोडू नका." यावर केंद्रित आहे. ही संकल्पना जलस्रोत, शाश्वत शेती आणि सर्वांसाठी पौष्टिक अन्नाचा हक्क यांच्यातील अत्यावश्यक संबंधावर प्रकाश टाकते. नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करणे, जागतिक अन्न प्रणाली सुधारणे आणि भौगोलिक स्थान किंवा उत्पन्नाचा विचार न करता प्रत्येकाला विविध आणि पौष्टिक आहार उपलब्ध होईल, हे सुनिश्चित करण्यावर संदेश भर देतात. जागतिक अन्न दिन २०२६ सरकार, समुदाय आणि व्यक्तींना एका चांगल्या, अन्न-सुरक्षित भविष्यासाठी कृती करण्याचे आवाहन करतो. जागतिक अन्न दिनाचे महत्त्व, अन्न सुरक्षा आणि पोषण साजरे केले जाते. अन्न सुरक्षा आणि पोषणाबद्दल शिक्षण देण्यासाठी समुदायांमध्ये, ऑनलाइन आणि शाळांमार्फत जनजागृती मोहीम आयोजित केली जाते. सरकारे आणि स्वयंसेवी संस्था पोषण मोहीम राबवतात, पौष्टिक जेवणाचे वाटप करतात आणि शाश्वत शेती उपक्रमांना पाठिंबा देतात. ऑनलाइन कार्यक्रम, वेबिनार, पोस्टर स्पर्धा आणि जागतिक हॅशटॅगचा वापर यांद्वारे जागतिक अन्न दिनासाठी डिजिटल जागरूकता वाढवली जाते. जगभरात रॅली, सार्वजनिक भाषणे, निधी संकलन आणि अन्नदान यांसारख्या सहभागाच्या उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाते.

"शून्य भूक एका कृतीने सुरू होते." - एफओ. आपली कृती हेच आपले भविष्य - शून्यभूक जगासाठी आरोग्यदायी आहार. कोणीही उपाशीपोटी झोपू नये. अन्न हा मूलभूत मानवाधिकार आहे, विशेषाधिकार नाही. पोषणाने समृद्धी - प्रत्येक जेवण महत्त्वाचे आहे. निरोगी उद्यासाठी आजचे सुरक्षित अन्न. कोणालाही मागे सोडू नका:सक्षम करा. पोषण करा. टिकवून ठेवा. अन्नावर चिंतन करा आणि सहभागी व्हा.

भारताची लोकशाही आणि संविधान : खरा धोका कोणापासून?

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

भारतीय राज्यघटनेच्या रक्षणाचा मुद्दा हा सध्याच्या भारतीय राजकारणातील सर्वात प्रमुख आणि वादग्रस्त घटकांपैकी एक आहे. काँग्रेस पक्ष आणि विरोधी आघाडी सातत्याने असा दावा करत आहेत की भाजप सरकारकडून संविधानाला धोका निर्माण झाला आहे, तर दुसरीकडे सत्ताधारी भाजपने हा दावा पूर्णपणे फेटाळून लावत याला 'निवडणुकीचा खोटा प्रचार' आणि 'भय निर्माण करण्याचे राजकारण' म्हटले आहे. काँग्रेस आणि विरोधी पक्षांनी आपल्या २०२४ च्या लोकसभा निवडणूक प्रचारात व आता देखील लोकशाही व संविधानाच्या रक्षणाचा मुद्दा केंद्रस्थानी ठेवला आहे. सत्ताधारी पक्षाला संसदेत प्रचंड बहुमत मिळाल्यास ते संविधानाचे मूळ रूप बदलू शकतात, असा प्रचार काँग्रेसने विशेषतः २०२४ च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान केला.

'४०० पार' या घोषणेचा वापर संविधान बदलण्यासाठी केला जाईल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली होती.आता देखील निवडणूक आयोग, सीबीआय, ईडी, आणि न्यायव्यवस्था यांसारख्या जागतिक आव्हाने कायम असताना जागतिक अन्न दिन एका निरोगी, भूकमुक्त जगासाठी जागरूकता निर्माण करण्यास आणि उपाययोजनांना प्रोत्साहन देण्यासाठी व्यक्ती, शाळा, समुदाय आणि सरकार यांना एकत्र आणतो. जागतिक अन्न दिनाची घोषणा सन १९७९ मध्ये एफएओ द्वारे, दि.१६ ऑक्टोबर १९४५ रोजी झालेल्या तिच्या स्थापनेच्या स्मरणार्थ करण्यात आली. भूक निर्मूलन, पोषण सुधारणा आणि शाश्वत अन्न प्रणालींना प्रोत्साहन देण्यासाठी आंतरराष्ट्रीय प्रयत्नांचे नेतृत्व करण्यास एफएओची स्थापना संयुक्त राष्ट्रांची एक विशेष संस्था म्हणून करण्यात आली. दुसऱ्या महायुद्धाच्या विनाशकारी परिणामांनंतर भूक निर्मूलन आणि अन्न सुरक्षेला पाठिंबा देण्यासाठी जागतिक सहकार्याच्या तातडीच्या गरजेला प्रतिसाद म्हणून जागतिक अन्न दिनाची स्थापना करण्यात आली. आज १५० हून अधिक देश हा दिवस साजरा करतात, ज्यामुळे तो अन्न आणि पोषणावरील सर्वात प्रमुख आंतरराष्ट्रीय जागरूकता कार्यक्रमांपैकी एक बनला आहे.

काँग्रेसच्या या आरोपांना भाजपने जोरदार प्रत्युत्तर दिले असून, काँग्रेसचा स्वतःचा इतिहास या मुद्द्यावर कसा राहिला आहे याकडे लक्ष वेधले आहे. भारताच्या संविधानाला आणि लोकशाहीला खरा धोका भाजप पासून नव्हे तर काँग्रेस पासून आहे. काँग्रेसने लोकशाहीची मूल्य आणि संविधानिक मूल्य पायदळी तुडविले हा इतिहास आहे.काँग्रेसच्या कार्यकाळात लोकशाही संस्थांचे अवमूल्यन झाले,असा भाजपचा आरोप आहे. या आरोपात तथ्य दडले आहे, याकडे दुर्लक्ष करता येणार नाही

काँग्रेस पक्षावर होणाऱ्या टीकेचा सर्वात मोठा आधार म्हणजे १९७५ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी लागू केलेली आणीबाणी हा आहे. या काळात नागरिकांचे मूलभूत हक्क स्थगित करण्यात आले, विरोधी पक्षाच्या नेत्यांना तुरुंगात टाकण्यात आले आणि प्रसारमाध्यमांवर सेन्सॉरशिप लादली गेली. हा काळ भारतीय लोकशाहीतील सर्वात मोठा काळा ठिपका मानला जातो.

२५ जून १९७५ च्या मध्यरात्री तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपती फखरुद्दीन अली अहमद यांनी भारतीय राज्यघटनेच्या कलम ३५२ अन्वये देशात आणीबाणी लागू केली। हा काळ मार्च १९७७ पर्यंत सुमारे २१ महिने चालला. २१ महिन्यांपर्यंत या देशाला काँग्रेसने वेठीस धरून विरोधी नेत्यांना तुरुंगात डांबले होते,हा इतिहास काँग्रेस विसरली का? जयप्रकाश नारायण यांच्यासह विरोधी पक्षाच्या शेकडो नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना विनाकारण तुरुंगेट टाकण्यात आले. नागरिकांचे मूलभूत हक्क आणि राजकीय स्वातंत्र्य स्थगित करण्यात आले.

वृत्तपत्रांवर कडक सेन्सॉरशिप लादली गेली आणि प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य हिरावून घेण्यात आले होते.या कालखंडाला भारतीय लोकशाहीच्या इतिहासात अत्यंत विवादित आणि काळा अध्याय मानले जाते, ज्यावरून आजही राजकीय वर्तुळात टीका केली जाते.

देशात आणीबाणी लावणारी काँग्रेस मोदी सरकारवर अहंश्य आणीबाणी लागल्याचे टीका करत आहे.भारतात 'अहंश्य आणीबाणी' लागू झाल्याचा आरोप विरोधी पक्षांतील नेते आणि काही राजकीय विश्लेषक मोदी सरकारवर सातत्याने करत आहेत. मोदी सरकारच्या धोरणांमुळे देशात लोकशाहीची घसरण झाली असून एक प्रकारे अघोषित किंवा अहंश्य आणीबाणी सुरू आहे, असा आरोप विरोधकांकडून केला जातो. मोदी सरकारने विरोधी पक्षाच्या नेत्यांना तुंगत टाकले नाही वृत्तपत्रांवर त्यांच्याशी बोलावली नाही नागरिकांच्या मूलभूत अधिकार गोठवले नाहीत विरोधक देशात अहंश्य आणीबाणी असल्याचा कांगावा करत खोटे आळ लावत आहे. एन डी ए सरकारच्या काळात तपास यंत्रणा कायद्यानुसार स्वतंत्रपणे काम करत असून, केवळ भ्रष्टाचारात लिप्त असलेल्या नेत्यांवरच कारवाई केली जात आहे. देशात नियमितपणे, पारदर्शक पद्धतीने निवडणुका पार पडत असून जनतेने मोदी सरकारला लोकशाही मागने कौल दिला आहे. सर्व कायदे संसदेत योग्य चर्चेनंतर आणि बहुमताने मंजूर केले जात आहे.

देशातील न्यायालये अजूनही सरकारविरोधी निर्णय देतात आणि नागरिकांच्या हक्कांचे रक्षण करतात, ज्यामुळे संस्था कमकुवत झाल्याचा आरोप खोटा ठरतो, असे समर्थकांचे म्हणणे आहे. खरी आणीबाणी १९७५ मध्ये काँग्रेस सरकारने लागू केली होती, जिथे मूलभूत अधिकार पूर्णपणे गोठवले गेले होते, वर्तमानपत्रांवर सेन्सॉरशिप होती आणि लाखो विरोधकांना तुरुंगात डांबले गेले होते. आजच्या स्थितीची तुलना त्या काळाशी करणे चुकीचे आहे. १९७७ मध्ये इंदिरा गांधी यांनी स्वतःहून आणीबाणी उठवली आणि देशात निवडणुका घेतल्या. या निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला.

आणीबाणीच्या काळात करण्यात आलेल्या ४२ व्या संविधान दुरुस्तीद्वारे संसदेचे अधिकार वाढवून न्यायपालिकेचे अधिकार काँग्रेसच्या राजवटीत मर्यादित करण्याचा घाट घातला गेला. ज्याला विरोधकांनी संविधानाचा मूळ संरचनेवरील आघात मानले. भारतीय संविधानाची ४२ वी घटनादुरुस्ती (१९७६) ही आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस सरकारने केली होती। या दुरुस्तीला 'मिनी राज्यघटना' असेही म्हटले जाते कारण यात संविधानात मोठ्या प्रमाणावर बदल करण्यात आले होते. संविधानाच्या प्रस्तावनेत 'समाजवादी' 'धर्मनिरपेक्ष' आणि 'अखंडता' हे तीन नवीन शब्द जोडण्यात आले. न्यायालयांचे अधिकार कमी करण्यात आले. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांचे न्यायालयीन पुनरावलोकन करण्याचे अधिकार मोठ्या प्रमाणात मर्यादित करण्यात आले. या दुरुस्तीद्वारे पंतप्रधानांचे कार्यालय आणि केंद्र सरकारकडे प्रचंड अधिकार सोपवण्यात आले होते. तसेच संसदेचा कार्यकाळ ५ वर्षांवरून ६ वर्षे करण्यात आला होता. ही दुरुस्ती १९७५-१९७७ च्या राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात करण्यात आली होती, जेव्हा अनेक विरोधी नेत्यांना तुरुंगात टाकण्यात आले होते. त्यामुळे याला लोकशाहीचा संकोच करणारी दुरुस्ती मानले जाते.

कलम ३५६ चा वापर करून काँग्रेसने अनेक राज्यातील गैर काँग्रेस सरकारे बरखास्त केली. काँग्रेसच्या कार्यकाळात केंद्रातील सरकारने राज्यांमधील विरोधी पक्षांची सरकारे बरखास्त करण्यासाठी कलम ३५६ (राष्ट्रपती राजवट) चा वारंवार वापर केल्याचा आरोप केला ज्यामुळे संघराज्य रचनेला धक्का पोहोचला, हा इतिहास आज काँग्रेस विसरत आहे का? संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या कलमाचा उल्लेख एक "मृत पत्र" म्हणून केला होता, ज्याचा वापर अत्यंत अपवादात्मक परिस्थितीतच केला जावा अशी त्यांची अपेक्षा होती.मात्र काँग्रेसने या कलमाचा वापर एक शस्त्र म्हणून केला.स्वातंत्र्यानंतरच्या प्रदीर्घ कार्यकाळात, विशेषतः १९६० ते १९८० च्या दशकात, केंद्र सरकारच्या शिफारशीवरून विविध राज्यांमध्ये ९० पेक्षा जास्त वेळा राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या कार्यकाळात कलम ३५६ चा वापर सर्वाधिक (सुमारे ५० वेळा) करण्यात आला.१९८० मध्ये पुन्हा सत्तेत आल्यावर इंदिरा गांधी सरकारनेही विरोधी पक्षांची ९ राज्य सरकारे बरखास्त केलीत. जनतेने निवडून दिलेले बहुमत असलेले सरकार केवळ राजकीय मतभेदांमुळे बरखास्त केल्याने लोकशाहीच्या मूळ भावनेला तडा गेला.

काँग्रेसने राज्यपालांच्या पदाचा गैरवापर करत अनेक राज्यातील सरकारे बरखास्त केली.अनेकदा राज्यपालांनी केंद्राचे प्रतिनिधी किंवा 'पडद्यामागील सूत्रधार' म्हणून काम करत राज्यांमध्ये घटनात्मक यंत्रणा कोसळल्याचा अहवाल केंद्राला पाठवला जायचा आणि सरकारी बरखास्त केली जायची हा काँग्रेसचा राजवटीचा इतिहास आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारच्या कार्यकाळात ५ ते ६ वेळा वेगवेगळ्या राज्यांमध्ये किंवा विशेष परिस्थितीत राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली आहे. १९९४ मधील सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक 'एस. आर. बोम्मई' निकालानंतर केंद्र सरकारकडून कलम ३५६ चा अनिर्बंध किंवा राजकीय कारणांसाठी होणारा वापर देशभरात मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. त्याआधीच्या काँग्रेस किंवा इतर सरकारांच्या तुलनेत एनडीए सरकारच्या काळात या कलमाचा वापर खूपच मर्यादित प्रमाणात केला गेला आहे.

संविधानाचे रक्षण आणि लोकशाही मूल्यांचे जतन ही देशातील प्रत्येक नागरिकाची आणि राजकीय पक्षाची नैतिक जबाबदारी आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, 'संविधान धोक्यात' असण्याचा मुद्दा हा सध्याच्या राजकीय लढाईचा एक भाग बनला आहे, जिथे दोन्ही बाजू स्वतःला संविधानाचे खरे रक्षक म्हणून सादर करण्याचा प्रयत्न करत आहेत आणि प्रतिस्पर्ध्यांना घटनाविरोधी ठरवत आहेत, मात्र काँग्रेस राजवटीत लोकशाही आणि संविधानिक मूल्य पायदळी तुडविल्या गेली, याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते की, "संविधान कितीही चांगले असले तरी ते चालवणारे लोक जर वाईट असतील, तर ते शेवटी वाईटच ठरेल." त्यामुळे लोकशाही आणि संविधानाला खरा धोका हा कोणत्याही एका पक्षाकडून किंवा व्यक्तीकडून नसून, संवैधानिक मूल्यांचा होणारा संकोच, संस्थांची कमकुवत पावले आणि नागरिकांची राजकीय उदासीनता यातून निर्माण होतो.

- ९५६१५९४३०६

वैज्ञानिक मर्यादा पुरुषोत्तमः सुब्रमण्यम चंद्रशेखर

कृष्णकुमार निकोडे
गडचिरोली

सुब्रमण्यम चंद्रशेखर (१९ ऑक्टोबर १९१० - २१ ऑगस्ट १९९५) हे एक भारतीय-अमेरिकन खगोल-भौतिकशास्त्रज्ञ होते. त्यांना ताऱ्यांच्या संरचना आणि उत्क्रांतीसाठी महत्त्वाच्या असलेल्या भौतिक प्रक्रियांच्या सैद्धांतिक अभ्यासासाठी सन १९८३ चा भौतिकशास्त्रातील नोबेल पुरस्कार विभागून देण्यात आला. ताऱ्यांच्या उत्क्रांतीवरील त्यांच्या गणितीय विवेचनामुळे प्रचंड वस्तुमान असलेल्या ताऱ्यांच्या उत्क्रांतीच्या नंतरच्या टप्प्यांची अनेक सध्याची सैद्धांतिक मॉडेल्स उदयास आली. चंद्रशेखर मर्यादा ही श्वेत बटूचे (१.४४ सौर वस्तुमान) कमाल वस्तुमान दर्शवते. या मर्यादेच्या वर, ताऱ्याचा अवशेष कोसळून न्यूट्रॉन तारा किंवा कृष्णविवर तयार होते. चंद्रा एक्स-रे वेधशाळेसह अनेक संकल्पना, संस्था आणि शोध त्यांच्या नावावर आहेत.

ब्रिटिश राजवटीच्या उत्तरार्धात जन्मलेल्या चंद्रशेखर यांनी त्यांच्या जीवनकाळात भौतिकशास्त्रातील विविध समस्यांवर काम केले आणि ताऱ्यांची रचना, श्वेत बटू, ताऱ्यांची गतिकी, यादृच्छिक प्रक्रिया, किरणोत्सर्गी स्थानांतरण, हायड्रोजन नायनचा क्वांटम सिद्धांत, हायड्रोडायनामिक आणि हायड्रोमॅग्नेटिक स्थिरता, अशांतता, समतोल आणि समतोलाच्या लंबवर्तुळाकार आकृत्यांची स्थिरता, सामान्य सापेक्षता, कृष्णविवरांचा गणितीय सिद्धांत आणि टक्कर देणाऱ्या गुरुत्वाकर्षण लहरींचा सिद्धांत यांसारख्या विषयांच्या समकालीन समजात योगदान दिले.

केंब्रिज विद्यापीठात त्यांनी श्वेत बटू ताऱ्यांच्या रचनेचे स्पष्टीकरण देणारे एक सैद्धांतिक मॉडेल विकसित केले, ज्यामध्ये त्यांच्या अपभ्रष्ट पदार्थाचा भाग असलेल्या इलेक्ट्रॉनच्या वेगांनुसार वस्तुमानाच्या सापेक्षतावादी बदलाचा विचार केला गेला होता. चंद्रशेखर यांनी आकाशगंगेच्या केंद्राभोवती फिरणाऱ्या ताऱ्यांवर आकाशगंगेतील बदलत्या गुरुत्वाकर्षण क्षेत्रांच्या परिणामांचा विचार करून जॅन ओर्ट आणि इतरांनी प्रथम मांडलेल्या ताऱ्यांच्या गतिकीच्या मॉडेल्समध्ये सुधारणा केली. या जटिल गतिकीय समस्येवरील त्यांच्या उपायाभ्यो वीस आंशिक अवकल समीकरणांचा एक संच समाविष्ट होता, जो त्यांनी "गतिकीय घर्षण" असे नाव दिलेल्या एका नवीन राशीचे वर्णन करतो, ज्याचे दुहेरी परिणाम आहेत. ताऱ्याचा वेग कमी करणे आणि ताऱ्यांच्या समूहांना स्थिर करण्यास मदत करणे. चंद्रशेखर यांनी या विश्लेषणाचा विस्तार आंतरतारकीय माध्यमापर्यंत केला आणि दाखवून दिले की आकाशगंगेतील वायू आणि धुळीचे ढग अत्यंत असमानपणे वितरित झालेले आहेत.

चंद्रशेखर यांनी प्रेसिडेन्सी कॉलेज, मद्रास आता चेन्नई आणि केंब्रिज विद्यापीठात शिक्षण घेतले. शिकागो विद्यापीठात दीर्घकाळ प्राध्यापक म्हणून कार्यरत असताना त्यांनी आपला काही अभ्यास वर्केस वेधशाळेत केला आणि सन १९५२ ते १९७१ पर्यंत "द स्ट्रोफिजिकल जर्नल"चे संपादक म्हणून काम केले. ते सन १९३७ पासून १९९५ दरम्यान वयाच्या ८४ व्या वर्षी त्यांच्या मृत्यूपर्यंत शिकागो विद्यापीठात विद्याशाखेत होते आणि मॉर्टन डी. हल डिस्टिंग्विश्ड सर्व्हिस प्रोफेसर ऑफ थिअरिटिकल एस्ट्रोफिजिक्स होते.

सुब्रमण्यम चंद्रशेखर यांचा जन्म दि.१९ ऑक्टोबर १९१० रोजी ब्रिटिश राजवटीतील सध्याचे पाकिस्तान- लाहोर येथे एका तमिळ ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांची आई सीता बालकृष्णन आणि वडील सी. सुब्रमण्यम अय्यर हे चंद्रशेखर यांच्या जन्माच्या वेळी वायव्य रेल्वेचे उपमहालेखा परीक्षक म्हणून लाहोरमध्ये कार्यरत होते.

-९६९९८३६७१७

नवेगाव येथील पुरातन श्री गंगादेवी मंदिर

रवींद्र गोविंद पांडे
नागपूर

आयुष्यातील कुठलीही गोष्ट ही योग जुळून आल्याशिवाय होत नाही. हा अनुभव अनेकांना आलेला असेल. तसाच मलाही आला. तोही माझ्या एका परममित्रामुळे. हा मित्र नेहमीच वेगवेगळ्या धार्मिक स्थळी जात असतो. त्याची एक चांगली गोष्ट आहे की तो एकटा कधीच जात नाही. सोबत दोन तीन मित्रांना घेऊन जात असतो.यावेळी माझा योग जुळून आला.

त्याप्रमाणे नवरात्रोत्सवाची सुरुवात होण्यापूर्वी म्हणजे दि.१९ सप्टेंबर रोजी नागपूर जिल्ह्यातील नवेगाव ता.कुही याठिकाणी त्यांच्यासोबत जाण्याचा योग जुळून आला. याठिकाणी एक अतिशय पुरातन देवीचे मंदिर आहे असे समजल्यावर माझ्या मनात उत्सुकता निर्माण झाली.

नागपूर पासून ६० कि.मी.अंतरावर असलेल्या नागपूर - आंभोरा मार्गावरील मांढळ पासून अंदाजे ३ किमी आत हे मंदिर आहे.मांढळपर्यंत चांगला रस्ता आहे.पण त्या मंदिरापर्यंतचा रस्ता काहीसा खडबडीत आहे. हा रस्त्याचे पुढे काही महिन्यांत सिमेंटीकरण होणार आहे असे समजले.

मंदिर परिसरात पोहोचताच समोर भव्य सभामंडपच दृष्टीपथात येतो. अन् त्याच्या बाजूलाच एक आकर्षक देवीची मूर्ती आहे. या देवीचे नाव आहे श्री गंगादेवी. काळ्या पाषाणाची अष्टभुजा महिषासुर मर्दिनी आहे. अतिशय रमणीय परिसर लाभलेले हे मंदिर सुमारे ७०० वर्षापेक्षा जास्त जुने आहे.

विदर्भातील वाकाटक कालीन इतिहास पुस्तकात या मंदिराचा उल्लेख आहे.इतिहास असा सांगतो की,पुरातन विभागाने नवेगाव पासून २ किमी अंतरावर अडम हे गाव आहे.या गावात पुरातत्व विभागाने खोदकाम करीत असतांना सुमारे १७०० वर्ष पुरातन नगरच आढळले.ज्या खोदकामात घरे,नाल्या,रस्ते आढळून आले. इतिहास तज्ज्ञांचा मते, जवळपास १७०० वर्षापूर्वी या गावचा ग्रीस देशांसोबत बांगड्याचा व्यापार होत होता.

या मंदिरातील देवीच्या दर्शनासाठी नागपूरचे भोसले राजे येत होते असा गॅझेटमध्ये उल्लेख आहे. नोंद आहे. या गावातील एका भक्ताला या देवीची मूर्ती जवळच असलेल्या एका नदीत आढळली.३ फुट उंचीची असलेल्या या मुर्तीला बाहेर काढायला १२ बैल जोड्यांची गाडी लावावी लागली असे म्हटल्या गेले.ती मुर्ती बाहेर काढल्यानंतर ही बैलगाडी ज्या ठिकाणी थांबली त्याच ठिकाणी या गंगादेवी चे मंदिर तयार झाले आहे असे सांगितले जाते.देवीची मुर्ती नदीत सापडल्याने या देवीला गंगादेवी म्हणतात.

गेल्या ७० ते ७५ वर्षापासून देवीच्या नवरात्रोत्सवात मोठी यात्रा भरते.पुर्वी माहूरच्या रेणुका मंदिरातर्फे या देवीसाठी साडी - चोळी येत असत असे गावातील जूने गावकरी सांगतात. ही अतिशय जागृत देवी असून मराठवाड्यातील अनेक भक्तांची ही देवी कुलदैवत आहे. या



मंदिराच्या परिसरात गावाच्या ग्रामदेवतेचे पुरातन मंदिर आहे तसेच भैरवनाथाचे मंदिर सुद्धा आहे.त्याचबरोबर गणपती, विठ्ठल रखुमाई, शंकराचे पंचायतन, हनुमान यांच्या गारीच्या बनवलेल्या मुर्त्या आहेत.या परिसरात गेले की अतिशय प्रसन्न होऊन जाते.

या मंदिर परिसरात जवळपास १००० वर्ष जूने वडाचे झाड आहे.या झाडावर आतापर्यंत तीन वेळा विज कोसळली.पण या झाडाचा काही फांद्या सोडून काहीही झाले नाही.या झाडांची मुळं गावापर्यंत पसरली आहेत. झाडाचा बूंधाच फारच अवाढव्य आकाराचा आहे.

अशा या जागृत देवस्थानची मधल्या काळात योग्य देखभाल न झाल्याने दुर्लक्षित झाले होते.परंतु नागपूर येथील एक व्यावसायिक श्री कृष्णा जी कढव यांच्या रूपाने भक्त या मंदिर परिसरात पोहोचले.या मंदिरासाठी आपण तनमनधनाने प्रयत्न करण्याचा निश्चय केला. अन् वर्ष १९९५ मध्ये श्री कढव आणि त्यांच्या मित्र परिवाराच्या पुढाकाराने, सहकार्याने या मंदिराचा जीर्णोद्धार केला गेला. या निमित्ताने या परिसरात तीन दिवस महालक्ष्मी याग करण्यात आला.या यागाला भक्तांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. या देवस्थानाच्या माध्यमातून फक्त धार्मिक कार्यक्रमांचे च आयोजन करण्यात येते असे नाही तर अनेक सामाजिक उपक्रम सुध्दा राबविले जातात.

१) दरवर्षी उन्हाळ्यात २१ दिवसीय बाल संस्कार शिबीर आयोजित करण्यात येते. या शिबीरात वेगवेगळ्या वयोगटातील मुलांचा सहभाग असतो.

२) माहे फेब्रुवारी महिन्यात शेतकरी बांधवांसाठी तीन दिवसीय उद्बोधन शिबीराचे आयोजन करण्यात येते.

३) रक्तदान शिबीर

४) जनावरांच्या आरोग्य विषयी तज्ञ डॉक्टरांद्वारे दिली जाते

जानेवारी २००८ मध्ये शतर्चडी महायज्ञाचे आयोजन करण्यात आले होते.या यज्ञाच्या निमित्ताने शेतकरी बांधवांसाठी शेतीसंबंधी याग करण्यात आला.या यागाला भक्तांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. या देवस्थानाच्या माध्यमातून लावले होते.याचा हजारो शेतकऱ्यांनी फायदा घेतला. तसेच या यज्ञाच्या निमित्ताने विदर्भ परिसरातील ५० संत एकत्रित आले होते.

गोहत्या बंदीसाठी गंगादेवी संस्थान तर्फे गोग्राम यात्रा काढण्यात आली होती. असे विविध प्रकारचे कार्यक्रम, सामाजिक प्रबोधन करणारे उपक्रम या गंगादेवी संस्थान च्या माध्यमातून घेतले जातात. मंदिराचा जीर्णोद्धार झाल्यानंतर संस्थानची प्रगतीच होत गेली.या देवस्थानच्या वतीने आश्विन नवरात्र आणि चैत्र नवरात्रोत्सव सुध्दा साजरा केले जातात.

हे अतिशय जागृत देवस्थान म्हणून ओळखले जात असल्याने तसेच या देवस्थानाला इतर उत्पन्नाचे स्त्रोत नसल्याने या मंदिराचा विकास व्हावा शुद्ध हेतूने सर्व देवी भक्तांनी सढळ हाताने मदत करावी असे आवाहन संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे

- ९३२५४५७०५२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

कोरोनाप्रमाणेच पाणी टंचाईच्या संकटाचा एकजुटीने सामना करू : राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल

रामटेक तालुक्यात पाणीटंचाई निवारणासाठी प्रशासन सज्ज, ॲड . आशिष जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक

पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरा, जलसंधारण व नियोजनावर राज्यमंत्र्यांचा भर

दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

राज्यात आणि नागपूर विभागात यंदा सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्यामुळे निर्माण झालेल्या सांभाव्य पाणी टंचाई च्या पार्श्वभूमीवर रामटेक तालुक्यातील पाणी टंचाई निवारण उपाययोजनाचा आढावा घेण्यासाठी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली विशेष आढावा बैठक शनिवार दिनांक १७ ऑक्टोबर २०२६ रोजी शेतकरी भवन, पंचायत समिती, रामटेक येथे संपन्न झाली. याप्रसंगी राज्यमंत्री ॲड. आशिष



जयस्वाल म्हणाले, "काही वर्षांपूर्वी आपण ज्या पद्धतीने कोरोनाच्या संकटाचा एकजुटीने सामना केला, त्याचप्रमाणे आज आपल्यासमोर दुष्काळ आणि पाणीटंचाईचे आव्हान उभे आहे. या संकटाचा सामना करण्यासाठी शासन, प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. शासन आणि प्रशासन परिस्थितीवर पूर्ण लक्ष ठेवून असून, गरजेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासह आवश्यक उपाययोजनांचे नियोजन सुरू आहे.

विधानसभा क्षेत्राचा आढावा घेत असतानाच स्थानिक लोकप्रतिनिधींनीही आपल्या भागातील परिस्थितीचा नियमित आढावा घ्यावा. रामटेक तालुक्यातील सर्व सरपंच, सचिव, तलाठी आणि ग्रामपंचायत सदस्यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, जनावरांसाठी आवश्यक पाणी आणि गावातील पाणीपुरवठ्याच्या अडचणी याबाबत योग्य नियोजन करावे. प्रत्येक गावातील परिस्थिती समजून घेऊन पाणीपुरवठ्याच्या समस्यांचे वेळेत निराकरण करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी सतर्क राहावे, असे निर्देश दिले.

भविष्यातील पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी लहान बंधारे बांधणे, पावसाचे पाणी अडवणे आणि जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. उपलब्ध पाणीसाठ्याचा काटकसरीने वापर करून पिण्यासाठी तसेच जनावरांसाठी आवश्यक पाणी राखून ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. काही गावांमधून पाणीसाठ्यातील केवळ १० टक्के पाणी राखून उर्वरित पाणी सोडण्याची मागणी पुढे आली आहे. यासंदर्भात उपलब्ध पाणीसाठा, नागरिकांच्या गरजा आणि भविष्यातील परिस्थितीचा विचार करून योग्य निर्णय घेण्यासाठी विचारविनिमय सुरू आहे. रामटेक परिसरात मानव-वन्यजीव संघर्षाचेही आव्हान आहे. दुष्काळामुळे पाणी आणि अन्नाच्या शोधात वन्यप्राण्यांच्या हालचाली वाढल्यास हा संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वनविभाग आणि प्रशासनानेही आवश्यक खबरदारी घेणे महत्त्वाचे आहे.

तसेच, शेतांमध्ये वनवा लावण्याच्या घटना टाळण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे. शेतातील आग लावून जमीन भाजल्याने कोणताही विशेष लाभ होत नाही; उलट जमिनीचे, पिकांचे आणि पर्यावरणाचे नुकसान होऊ शकते. आग नियंत्रणाबाहेर गेल्यास ती विझवण्यासाठी पाण्याचा अपव्यय होतो आणि प्रसंगी जीवितहानीचाही धोका निर्माण होतो. त्यामुळे अशा घटना टाळण्यासाठी शेतकऱ्यांचे प्रबोधन करून त्यांना जागरूक करणे गरजेचे आहे, असेही ते म्हणाले.

थोडक्यात

वडधामणा येथील कंपनीत चोरी करणाऱ्या सहा जणांना अटक

वाडी पोलिसांची २४ तासांत कारवाई; चोरीचे साहित्य, ऑटो रिक्षा आणि चार मोबाईल जप्त



दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

वडधामणा येथील सिग्मन फायर प्रोटेक्शन कंपनीत झालेल्या चोरीच्या प्रकरणाचा वाडी पोलिसांनी अवघ्या २४ तासांत छडा लावत सहा सहभागी चोरांना अटक केली. या कारवाईत चोरीचे साहित्य, गुन्ह्यात वापरण्यात आलेली ऑटो रिक्षा आणि चार मोबाईल फोन जप्त करण्यात आले. १५ ऑक्टोबरच्या रात्री अज्ञात चोरट्यांनी कंपनीत ठेवलेले विविध उत्पादनांशी संबंधित साहित्य चोरून नेले होते. याप्रकरणी कंपनीचे व्यवस्थापक स्वप्निल मुकुटे यांनी वाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून चोरीचा गुन्हा नोंदविला. पोलीस आयुक्त यशवंत नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पोलीस निरीक्षक नितीन मगर यांच्या नेतृत्वात उपनिरीक्षक उत्तम जयभये व त्यांच्या पथकाने तपासाची चक्रे वेगाने फिरविली. तपासादरम्यान साहिल पाचे (२०), प्रेम सागर दुपारे (२०), संजय कुमार चव्हाण (२८), शुभम नीत (२८), राहुल भैसवारे (२६) आणि राहुल पवार (२७) या सहा संशयितांना अटक करण्यात आली. हे सर्व वडधामणा परिसरातील रहिवासी असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

संशयितांच्या माहितीच्या आधारे एमएच-४९-०६९० क्रमांकाच्या ऑटो रिक्षामध्ये ठेवलेले चोरीचे साहित्य पोलिसांनी जप्त केले. या कारवाईत ऑटो रिक्षा, चार मोबाईल फोन आणि अन्य साहित्यही जप्त करण्यात आले. या प्रकरणी भारतीय दंड संहितेच्या कलम ३०५, ३२४, ३३१ व इतर संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास वाडी पोलीस करीत आहेत. कारवाईत सहभागी पोलीस पथकात उपनिरीक्षक उत्तम जयभये, नागेश्वर दासरवार, विकास वावदुडे, राहुल नागदवे, चंद्रकुमार टेकम आणि दिलीप बाजाड यांचा समावेश होता.

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त ज्योतिरामजी लोखंडे बहुउद्देशीय संस्थेतर्फे स्नेहभोजनाचे आयोजन २१ ला

बुधवारी, घाटरोड येथे सकाळी ८ ते दुपारी ३ वाजेपर्यंत कार्यक्रम

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपूरच्या पवित्र दीक्षाभूमीवर देश- विदेशातून येणाऱ्या धम्मबांधव-भगिनींसाठी ज्योतिरामजी लोखंडे बहुउद्देशीय संस्था, नागपूर यांच्या वतीने भव्य स्नेहभोजनदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थेतर्फे गेल्या ३९ ते ४० वर्षांपासून दरवर्षी या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत असून, यंदाही ही परंपरा कायम टेवण्यात आली आहे. येत्या बुधवारी सकाळी ८ ते दुपारी ३ वाजेपर्यंत प्लॉट क्रमांक ७/४, ज्योतिवृक्ष निवास, ज्योतिराम लोखंडे चौक, घाटरोड, नागपूर येथे हा स्नेहभोजनदान सोहळा पार पडणार आहे. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमीवर येणाऱ्या धम्मबांधव- भगिनींना स्नेहभोजनाचा लाभ घेता यावा, या उद्देशाने संस्थेने हा उपक्रम आयोजित केला आहे. संस्थेच्या वतीने तसेच समस्त लोखंडे परिवाराच्या सहकार्याने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या स्नेहभोजनदान सोहळ्यात धम्मबांधव- भगिनींनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन भोजनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ज्योतिरामजी लोखंडे बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

एकात्मता विद्यालयात उत्साहात गरबा महोत्सव संपन्न

विद्यार्थ्यांच्या कलाविष्कारातून संस्कृती संवर्धन आणि सामाजिक एकतेचा संदेश

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

सत्यमेव जयते शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूरद्वारा संचालित एकात्मता उच्च प्राथमिक विद्यालय, एकात्मता नगर, जयताळा, नागपूर येथे १७ ऑक्टोबर रोजी आनंदी शनिवार उपक्रमांतर्गत गरबा महोत्सवाचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले होते.


या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध आकर्षक पारंपरिक वेशभूषा परिधान करून उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. गरबाच्या तालावर विद्यार्थ्यांनी आपल्या नृत्यकलेचे सुंदर सादरीकरण केले. विद्यार्थ्यांच्या उत्साहपूर्ण सहभागामुळे संपूर्ण शालेय



परिसर आनंदमय आणि सांस्कृतिक रंगांनी न्हाऊन निघाला. विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच संस्कृतीची ओळख करून देणे, पारंपरिक कला व लोकपरंपरांचे जतन करणे आणि सामाजिक एकतेची भावना रुजविणे हे शालेय शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. विविध सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य, शिस्त, संघभावना आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण होते. एकत्रितपणे काम करण्याचे कौशल्य विकसित होऊन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासालाही चालना मिळते. याच उद्देशाने विद्यालयात गरबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला एकात्मता परिसरातील उद्योजक मिथुन नागदेवते यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक शरद उरकुडे, सहाय्यक शिक्षिका शुभांगी कातुरे, सुनीता गावंडे, धनश्री ढेगेकर यांच्यासह शिक्षकवृंद उपस्थित होते. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभागामुळे आणि सर्वांच्या सहकार्यामुळे हा कार्यक्रम आनंददायी, उत्साहपूर्ण व संस्मरणीय वातावरणात संपन्न झाला. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृतीविषयी आदर निर्माण होऊन एकता, बंधुभाव आणि सामाजिक सलोख्याची मूल्ये दृढ होतात. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक सांस्कृतिक उपक्रमांनाही प्राधान्य दिले जात आहे.

जिल्हा परिषद प्रायमरी सेमी इंग्लिश स्कूल भोवरी येथे वाचन प्रेरणा दिन साजरा



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, वाचन संस्कृती रुजावी आणि विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्यांचा विकास व्हावा, या उद्देशाने जिल्हा परिषद प्रायमरी सेमी इंग्लिश स्कूल भोवरी येथे गुरुवार, १५ ऑक्टोबर रोजी भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी आवडीची पुस्तके निवडून त्यांचे लक्षपूर्वक वाचन केले. वाचलेल्या पुस्तकातील गोष्टी आपल्या शब्दात मांडण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थी एकाग्रतेने, समजपूर्वक आणि योग्य उच्चारांसह वाचन करताना पाहून शाळेच्या मुख्याध्यापिका पठाण तब्बसूम अयुबखान पठाण यांना विशेष आनंद झाला. विद्यार्थ्यांच्या वाचनातील प्रगती आणि त्यांचा उत्स्फूर्त सहभाग पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी मुख्याध्यापिका यांनी चंपक इंग्रजी एडिशनची पुस्तके शाळेला भेट दिली.

पुस्तकांशी मैत्री, नियमित वाचन आणि वाचलेल्या साहित्याचे आकलन या माध्यमातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, शब्दसंपत्ती, कल्पनाशक्ती आणि विचारक्षमता विकसित होण्यास मदत होते. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना वाचनाचा आनंद मिळण्यासोबतच स्वतःचे विचार प्रभावीपणे मांडण्याची संधीही मिळाली. 'वाचाल तर वाचाल, वाचनातूनच घडेल उज्ज्वल भविष्य' हा संदेश देत शाळेत वाचन संस्कृती जोपासण्याचा संकल्प करण्यात आला. याप्रसंगी केंद्रप्रमुख राजु आंबिलकर, शाळा व्यवस्थापन अध्यक्ष अंकुश निरगुळकर, उपाध्यक्ष प्रल्हाद वैद्य तसेच ग्रामपंचायत सदस्य काशिनाथ गिऱ्हेपुंजे, पोलिस पाटील प्रशांत वाडीभस्मे, स्वयंपाकी शोभा बावणे आणि अंगणवाडी सेविका ज्योती वाडीभस्मे उपस्थित होते.

ग्रामीण रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या वर्तनावर प्रश्नचिन्ह

रुग्णांच्या नातेवाइकांची अवहेलना केल्याचा आरोप, पोलिसांची भीती दाखविल्याची तक्रार

दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाइकांना कर्मचाऱ्यांकडून कथित अरेरावीचा सामना करावा लागत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. डॉक्टरांसह काही आरोग्य कर्मचारी आणि सुरक्षा रक्षकांच्या वर्तनाबाबत नागरिकांनी नाराजी व्यक्त केली असून, तक्रारदारांना पोलिसांची भीती दाखविल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

शुक्रवारी (दि. १७) रात्री सुमारे नऊच्या सुमारास एका गंभीर आजारी रुग्णाच्या नातेवाइकांना उर्मट वागणूक मिळाल्याची पोलिसांत देण्याची धमकी दिली



जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाइकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

शासकीय रुग्णालय हे सर्वसामान्यांसाठी उपचाराचे महत्त्वाचे केंद्र आहे. त्यामुळे रुग्णांशी सौजन्याने वागणे आणि त्यांच्या तक्रारींची दखल घेणे अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा आरोग्य प्रशासनाने प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी, सीसीटीव्ही चित्रण तपासावे आणि दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

एच.एस.महात्मे संस्कार विहार स्कूलमध्ये आरोग्य तपासणी शिबिर

लायन्स क्लब नागपूर अमेतर्फे विद्यार्थ्यांसाठी नेत्र व दंत तपासणी, बेंच वितरण उपक्रमही संपन्न

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

एच.एस.महात्मे संस्कार विहार स्कूल येथे लायन्स क्लब नागपूर अमेच्यावतीने व्हिजन सर्व्हिस वीक अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी नेत्र तपासणी व दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना बेंच वितरणाचाही उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांचा



आरोग्याची काळजी घेणे आणि त्यांच्यामध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. शालेय विद्यार्थ्यांचा डोळ्यांची व दातांची तपासणी करून त्यांच्या आरोग्याबाबत आवश्यक मार्गदर्शन करण्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमाचे प्रोजेक्ट डायरेक्टर्स रामदास ठाकरे, श्रीमती लता ठाकरे व डॉ.गौरव अग्रवाल होते. कार्यक्रमाला लायन्स क्लबच्या अध्यक्षा श्रीमती कीर्ती खेरडे, सचिव श्रीमती अश्विनी गिरीपुंजे आणि खजिनदार टखऋश्रीमती उषा ढोबळे यांच्यासह क्लबचे सर्व सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन विद्यार्थी अंश गुप्ता याने केले, तर शौर्य आंबिलढुके याने आभार प्रदर्शन केले. लायन्स क्लबच्या पदाधिकाऱ्यांच्या पुढाकाराने आणि सर्व सदस्यांच्या सहकार्याने हा आरोग्यविषयक व सामाजिक उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

बल्लारपूरच्या सुरक्षेसाठी अत्याधुनिक सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्याची मागणी : मुख्यमंत्र्यांचे तातडीच्या कार्यवाहीचे निर्देश

दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर - धनंजय पांढरे

शहरातील नागरिकांची सुरक्षितता अधिक बळकट करण्यासह वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी बल्लारपूर शहरात अत्याधुनिक सीसीटीव्ही सर्व्हेलन्स प्रणाली उभारण्यात यावी, अशी मागणी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या मागणीची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी अपर मुख्य सचिव (गृह) यांना नियमानुसार तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे बल्लारपूर शहरातील सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल पडले आहे.

औद्योगिक आणि व्यापारीदृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या बल्लारपूर शहरात नागरिकांना सुरक्षित वातावरणात निर्भयपणे वावरता यावे, तसेच गुन्हेगारीच्या घटनांवर प्रभावी नियंत्रण ठेवता यावे, यासाठी आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित सुरक्षा यंत्रणा उभारण्याची आवश्यकता आमदार मुनगंटीवार यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिली.



शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठा, संवेदनशील ठिकाणे तसेच शहरात येणाऱ्या-जाणाऱ्या प्रमुख मार्गांवर उच्चक्षमतेचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणी त्यांनी केली आहे.

या प्रस्तावित प्रणालीमध्ये आधुनिक नियंत्रण कक्ष, सीसीटीव्ही फुटेजचा रेकॉर्डिंग व साठवणुकीची व्यवस्था, आवश्यक नेटवर्किंग आणि अखंडित वीजपुरवठ्या साठीच्या सुविधांचा समावेश असणार आहे. या यंत्रणेमुळे शहरातील संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे, गुन्हे घडण्यापूर्वी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आणि गुन्ह्यांच्या तपासासाठी आवश्यक दृश्य पुरावे उपलब्ध करून घेणे पोलिसांना अधिक सुलभ होणार आहे. परिणामी, शहरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यास मदत मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारानंतर चंद्रपूरचे पोलीस अधीक्षक यांनी सीसीटीव्ही सर्व्हेलन्स प्रणाली उभारण्यासंदर्भातील सविस्तर प्रस्ताव गृह विभागाकडे सादर केला आहे. या प्रस्तावाला तांत्रिक मान्यता मिळून आवश्यक निधी उपलब्ध व्हावा, यासाठी आमदार मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा केला.

नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित या मागणीची मुख्यमंत्र्यांनी तातडीने दखल घेत अपर मुख्य सचिव (गृह) यांना नियमानुसार तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. आता संबंधित प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण होऊन प्रस्तावाला मान्यता आणि आवश्यक निधी मिळाल्यानंतर सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्याचा मार्ग मोकळा होण्याची अपेक्षा आहे.

शहरातील प्रमुख ठिकाणांवर आधुनिक सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित झाल्यास गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्याबरोबरच पोलिसांच्या तपासाला तांत्रिक आधार मिळू शकतो. तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना दृढ होण्यास मदत होईल. बल्लारपूर शहराच्या सुरक्षेच्या दृष्टीने या प्रस्तावाकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

ग्राम विकास विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय मेटपांजरा येथे 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात



दै. सिंहवाणी वृत्त, काटोल

ग्राम विकास विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मेटपांजरा येथे भारताचे माजी राष्ट्रपती तथा थोर शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' अत्यंत उत्साहात व विविध ज्ञानवर्धक उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या प्राचार्या डॉ वैशाली टालाटूले मॅडम ,प्रमुख पाहुणे म्हणून केंद्र प्रमुख धारपुरे सर उपस्थित होते.

या दिनाचे औचित्य साधून विद्यालयात 'सामूहिक मौन वाचन' उपक्रम राबवण्यात आला. यामध्ये पहिली ते बारावीच्या सर्व विद्यार्थ्यांनी एकाच वेळी आवडीच्या पुस्तकांचे वाचन केले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्यांनी, "विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात शैक्षणिक पुस्तकासोबत ग्रंथालयातील पुस्तकांचे वाचन केले पाहिजे वाचनामुळे विचार समृद्ध होतात आणि व्यक्तिमत्त्वाला योग्य दिशा मिळते," असा संदेश दिला.

मोरे सर यांनी ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनावर प्रकाश टाकला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मदनकर मॅडम यांनी केले, कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

थोडक्यात

तारसा - माथणी जि.प क्षेत्र अंतर्गत येणाऱ्या गावातील दुर्गा उत्सव मंडळाला महसूलमंत्री बावनकुळे यांच्याकडून वर्गणीचे मौदा तालुका भाजप पदाधिकाऱ्यांकडून वाटप



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

गुरुवार (ता. १५ ऑक्टोबर) ला तारसा -माथनी जि प क्षेत्र अंतर्गत येत असलेले गावे माथनी, धामणगाव, आंजणगाव, ईसापुर, राहाडी, नरसाळा,झुल्लर येथे नवदुर्गा उत्सव मंडळाला महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून आलेल्या वर्गणीचे नवदुर्गा उत्सव मंडळाला भेटी देत भाजपा तालुका पदाधिकाऱ्याकडून वाटप करण्यात आले. तसेच सध्याच्या दुष्काळजन्य परिस्थितीमुळे शेतकऱ्यांवर आलेल्या संकटातून लवकरात लवकर सुटका होऊ दे आणि सर्वांवर मातेची कृपा राहू दे अशी प्रार्थना याप्रसंगी करण्यात आली. याप्रसंगी नरेश मोटघरे उपाध्यक्ष भाजपा नागपूर जिल्हा, विनोद मदनकर मौदा भाजपा किसान आघाडी तालुकाध्यक्ष,विरेंद्र पायतोडे भाजयुमो मौदा तालुका कार्याध्यक्ष तथा जिल्हा उपाध्यक्ष, सचिन मोटघरे तालुका भाजपा नेते, मंगेश तिघरे भाजपा तालुका महामंत्री, श्याम नारनवरे अनुसूचित जमाती भाजपा तालुकाध्यक्ष, आकाश येळणे भाजयुमो तालुका महामंत्री, सचिन मस्के तालुका भाजपा नेते, चिंतामण सारवे आजनगाव सरपंच तथा तालुका भाजपा नेते, शुभम येळणे तसेच तारसा- माथनी या जि. प क्षेत्रातील भाजपा व भाजयुमो नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते व बुथ प्रमुख होते.

विद्यार्थ्यांनी शिक्षणा बरोबर समाजकार्य करायला शिकले पाहिजे! : प्रा. माधुरी घार्गे-काळभोर



दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

आजच्या संगणकीय, इंटरनेट आणि अकच्या युगात शिक्षणाबरोबर समाजसेवेला सुद्धा अनन्या साधारण महत्व आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षणाबरोबर समाजाला उपयुक्त अश्या सर्वच विभागाचे ज्ञान घेणे आवश्यक आहे. म्हणून विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घ्यावे असे मार्गदर्शन प्राध्यापिका सौ. माधुरी घार्गे-काळभोर यांनी आदर्श शिक्षण समितीने लोअर परेल येथे नुकताच आयोजित केलेल्या ६५ व्या विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यात काढले. या वेळी शांताराम गोवळकर यांना ८० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल त्यांना दीघार्युष्य लाभो अशी उपस्थितानी प्रार्थना केली. यावेळी त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुछ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला अध्यक्ष - सुरेश पवार यांनी उपस्थित सर्व पाहुण्यांचे, विद्यार्थ्यांचे व पालकाचे स्वागत केले. समितीची प्रस्थावना करताना गेल्या ६४ वर्षांच्या प्रवासाचा आढावा घेताना समितीचे तहहयात विश्वस्थ - शांतारम गोवळकर यांनी आदर्श शिक्षण समितीसाठी फार मोठे योगदान दिलेले आहे. त्यांनी या समितीच्या आर्थिक व सामाजिक भरभराटी साठी तन, मन, धन अर्पन केलेले आहे. सेक्रेटरी-भारत पाटणकर यांनी पाहुण्यांना शाल, श्रीफळ व पुष्पगुछ देऊन स्वागत केले. प्रमुख पाहुणे दत्तात्रय दळवी यांनी आदर्श शिक्षण समितीच्या रूपाने लावलेल्या या झाडाला शांताराम गोवळकर यांनी आर्थिक खतपाणी घालून मोठे केले आहे. त्यानंतर शांताराम गोवळकर यांनी सांगितले की माझे सहकारी कै. शंकर पाटणकर यांचे सहकार्य मोलाचे होते. समितीच्या सर्व कार्यकर्त्यांना या समितीचे पुढील कार्य व्यवस्थित चालू ठेवण्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी आयकर उपायुक्त- हरीश केळकर, अधीक्षक - प्रकाश पवार, रमेश पवार हे सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांचा स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ व पुष्पगुछ देऊन सन्मान करण्यात आला. तर चिन्मयी पाटणकर - आर्किटेक्ट, मृण्मयी पाटणकर व चिन्मय पाटणकर हे एम. बी. ए. झाल्याबद्दल व १० वी मध्ये कु. प्रांजला वाडेकर - ९२ टक्के व साक्षी शिरकार- ७३ टक्केने पास झाल्याबद्दल स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ व पुष्पगुछ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी पहिली ते नववी मध्ये उत्तम गुण मिळवून पास झालेल्या विद्यार्थ्यांचा सुद्धा सन्मान करण्यात आला. तर उपस्थित पालकांना भेटवस्तू देऊन सन्मानीत करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रमाचे उत्तम सूत्रसंचलन अनंत दाभोळकर यांनी केले.

ट्रकला मागून दुचाकीची धडक : २४ वर्षीय रोहन डोंगरेचा जागीच मृत्यू

दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर :-(धनंजय पांढरे)

भरधाव दुचाकीने ट्रकला मागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात २४ वर्षीय दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला.



ही दुर्दैवी घटना शुक्रवार, १६ ऑक्टोबर रोजी रात्री सुमारे १०.१५ वाजताच्या सुमारास बल्लारपूर येथील रेल्वे चौकाजवळ घडली. रोहन सुधाकर डोंगरे २४ वर्ष, रा. इंदिरानगर, गडचांदूर, जि. चंद्रपूर असे मृत तरुणाचे नाव आहे. तो महाविततरणमध्ये कंत्राटी कर्मचारी म्हणून कार्यरत होता. मिळालेल्या माहितीनुसार, ट्रक क्रमांक एमएच ४० एके ३८२९ हा राजुराच्या दिशेने जात होता. त्याचवेळी दुचाकी क्रमांक एमएच ३४ बीयू ८३३४ वरून रोहन डोंगरे हा जुन्या बसस्थानकाच्या दिशेने जात होता.

दरम्यान, रेल्वे चौकाजवळ भरधाव वेगाने जाणाऱ्या दुचाकीने पुढे चाललेल्या ट्रकला मागून जोरदार धडक दिली. या अपघातात रोहन याला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच बल्लारपूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालय, बल्लारपूर येथे पाठविण्यात आला. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, प्रकरणाचा पुढील तपास बल्लारपूर पोलीस करीत आहेत.

'नागपूर ते पंजाब' चार राज्यांचा प्रवास; आस्था निवारा गृहाने घडविले मिलन!

वारंवार भरकटणाऱ्या ७७ वर्षीय बाबुराम ज्येष्ठ नागरिकाला आस्था पुनर्वसन निवारा गृहाच्या पुढाकारातून पुन्हा मिळाला कुटुंबाचा आधार

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

विसराळूपणा आणि मानसिक स्थितीतील अडचणींमुळे वारंवार भरकटणाऱ्या ७७ वर्षीय बाबुराम यांना अखेर त्यांच्या कुटुंबीयांपर्यंत सुरक्षितपणे पोहोचविण्यात यश आले. नागपूर महानगरपालिकेच्या केंद्र शासन पुरस्कृत समाज विकास विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या भिक्षेकरी पुनर्वसन प्रकल्पातील सह्याद्री फाउंडेशन संचलित आस्था पुनर्वसन निवारा गृहाच्या पुढाकारातून १५ ऑक्टोबर २०२६ रोजी पंजाब राज्यातील त्यांच्या मूळ गावी परिवार मिलन घडवून आणण्यात आले.

बाबुराम हे पाचपावली पोलीस ठाण्याच्या माध्यमातून आस्था पुनर्वसन निवारा गृहात दाखल झाले होते. निवारा गृहात दाखल झाले, तेव्हा त्यांची मानसिक स्थिती अस्थिर होती. सुरुवातीच्या काळात ते वारंवार आरडाओरडा करीत असत. विसराळूपणामुळे ते निवारा गृहाच्या परिसरात भटकत असत. तसेच, इतरांशी वाद होण्याचे प्रसंगही घडत होते. त्यामुळे त्यांची योग्य देखभाल, समुपदेशन आणि सुरक्षितता यांना प्राधान्य देण्यात आले.

यापूर्वीही बाबुराम विसराळूपणामुळे राजस्थान आणि पंजाब परिसरात भरकटले होते. त्यावेळी त्यांच्या कुटुंबीयांनी शोध घेऊन त्यांना पुन्हा घरी आणले होते. मात्र, त्यानंतरही ते पुन्हा भरकटले आणि चार राज्यांचा प्रवास करीत नागपूरपर्यंत पोहोचले. त्यामुळे त्यांना सुरक्षितपणे त्यांच्या कुटुंबीयांपर्यंत पोहोचविणे महत्त्वाचे होते.

पोलिसांच्या सहकार्याने कुटुंबाचा शोध

आस्था निवारा गृहात दाखल झाल्यानंतर बाबुराम यांच्या आरोग्याची, दैनंदिन गरजांची आणि मानसिक स्थितीची काळजी घेण्यात आली. त्यांचे समुपदेशन करण्यात आले,



तसेच कुटुंबीयांचा शोध घेण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले. आस्था निवारा गृहाचे व्यवस्थापक वैभव बागडे यांनी बाबुराम यांची परिस्थिती लक्षात घेऊन अजनी पोलीस ठाण्याच्या मिसिंग विभागातील रुखसार शेख यांच्याशी संपर्क साधला आणि आवश्यक माहिती दिली. त्यानंतर संबंधित पोलीस यंत्रणेच्या सहकार्याने पंजाबमधील त्यांच्या कुटुंबीयांचा शोध घेण्यात आला.

काही दिवसांच्या प्रयत्नांनंतर कुटुंबीयांशी संपर्क प्रस्थापित झाला. बाबुराम नागपूर येथील आस्था पुनर्वसन निवारा गृहात सुरक्षित असल्याची माहिती त्यांना देण्यात आली. आवश्यक माहितीची पडताळणी केल्यानंतर परिवार मिलनाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

चार राज्यांचा प्रवास करून कुटुंबीयांशी पुनर्भेट

कुटुंबीयांचा शोध लागल्यानंतर बाबुराम यांना त्यांच्या मूळ गावी पोहोचविण्याचे नियोजन करण्यात आले. आस्था निवारा गृहाचे सामाजिक कार्यकर्ते तुषार रामचंद्रजी हुकरे यांनी रेल्वेने प्रत्यक्ष प्रवास करून बाबुराम यांना पंजाबमधील त्यांच्या मूळ गावी नेले आणि कुटुंबीयांच्या स्वाधीन केले. यावेळी कुटुंबीयांचेही समुपदेशन करण्यात आले.

कुटुंबीयांचा शोध घेण्यापासून ते प्रत्यक्ष घरी पोहोचविण्यापर्यंत संपूर्ण प्रक्रिया पार पाडण्यात आली. चार राज्यांचा प्रवास करून घडवून आणलेल्या या परिवार मिलनातून पुनर्वसन कार्यातील सातत्य, संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकी अधोरेखित झाली.

नात्याला मिळाला आधार

रस्त्यावर भरकटलेल्या आणि कुटुंबापासून दूर गेलेल्या व्यक्तींना सुरक्षित निवारा, आवश्यक देखभाल, समुपदेशन आणि कुटुंबीयांशी पुनर्भेट मिळवून देणे हे आस्था पुनर्वसन निवारा गृहाच्या कायार्चे महत्त्वाचे अंग आहे. बाबुराम यांचे परिवार मिलन हे या कार्याचे आणखी एक उदाहरण ठरले. त्यांना प्रत्यक्ष त्यांच्या मूळ गावी पोहोचवून कुटुंबीयांच्या स्वाधीन केल्याने पुन्हा कुटुंबाचा आधार मिळवून देण्याचा प्रयत्न यशस्वी झाला.

या परिवार मिलनासाठी सह्याद्री फाउंडेशनचे संचालक देवेंद्र श्रीरसागर, व्यवस्थापक दिपक पसारकर यांचे मार्गदर्शन लाभले. आस्था निवारा गृहाचे अधीक्षक गौतम नागरे, सामाजिक कार्यकर्ते तुषार रामचंद्र हुकरे, व्यवस्थापक वैभव बागडे, काळजीवाहक कार्तिक कोडवते व अनंता नागोसे, डॉ. अमिषा केसरे, समुपदेशक संजना मडकाम, परिचारिका योगिता भूमकर तसेच इतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. अजनी पोलीस ठाण्याच्या मिसिंग विभागासह संबंधित पोलीस यंत्रणेचेही महत्त्वपूर्ण सहकार्य मिळाले.

पी.एम.श्री. शाळा चाचेर येथे 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा

पुस्तकांशी मैत्री, ज्ञानाची भरारी! विद्यार्थ्यांनी सामूहिक वाचनातून दिला प्रेरणादायी संदेश



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, ज्ञानाचा विस्तार व्हावा आणि वाचन संस्कृती रुजावी, या उद्देशाने पी.एम.श्री. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, चाचेर येथे भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि मिसाईल मॅन म्हणून ओळखले जाणारे डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध पुस्तके, गोष्टींची पुस्तके आणि शैक्षणिक साहित्याचे वाचन केले. विद्यार्थ्यांनी हातात पुस्तके घेऊन सामूहिक वाचनात सहभाग नोंदवला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना पुस्तकांचे महत्त्व, नियमित वाचनाची सवय आणि ज्ञानप्राप्तीचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी आपल्या जीवनातून शिक्षण, जिद्द, मेहनत आणि मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा दिली. विद्यार्थ्यांनीही नियमित वाचन करून आपले ज्ञान वाढवावे, जिज्ञासू वृत्ती जोपासावी आणि जीवनात मोठे ध्येय निश्चित करावे, हा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

वाचन हीच ज्ञानाची गुरुकिल्ली या विचाराला अनुसरून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. पुस्तकांच्या सहवासातून विद्यार्थ्यांची शब्दसंपत्ती वाढते, भाषिक कौशल्य विकसित होते, कल्पनाशक्तीला चालना मिळते आणि विचार करण्याची क्षमता अधिक समृद्ध होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी दररोज काही वेळ वाचनासाठी राखून ठेवावा, असे आवाहन करण्यात आले.

या उपक्रमामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना पुस्तकांशी मैत्री करण्याची आणि ज्ञानाच्या नव्या विश्वाची ओळख करून घेण्याची संधी मिळाली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी वाचन संस्कृती महत्त्वाची असल्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाला शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जीवन सहारे, शाळेचे मुख्याध्यापक अनिल गडपायले सह व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

दवलामेटीच्या सिद्धार्थ सोसायटी गणेशोत्सव मंडळाचा जिल्ह्यात प्रथम क्रमांक!

५० हजार रुपये, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्राने गौरव



दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या वतीने आयोजित उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६ मध्ये दवलामेटी येथील श्री शक्ती प्रतिष्ठान, दुर्गामाता मंदिरद्वारा संचालित सिद्धार्थ सोसायटी गणेशोत्सव मंडळाने नागपूर जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला.

१६ ऑक्टोबर रोजी मुंबईतील रवींद्र नाट्यमंदिर येथे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते मंडळाचे पदाधिकारी आयुष बाली, अद्वैत वऱ्हाडपांडे व वेदांत खैरकर यांना ५० हजार रुपये, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या नियोजनबद्ध कार्यामुळे हे यश मिळाले. या यशाबद्दल दवलामेटीसह परिसरातून मंडळाचे अभिनंदन होत आहे.

दुसऱ्या तालुक्यात दस्त नोंदणी करायची? आता आधी परवानगी घ्या!

'एक जिल्हा, एक नोंदणी' उपक्रमात नवा नियम, जमीन-घर खरेदीदारांनी सावध राहावे

दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड

महाराष्ट्र शासनाच्या मुद्रांक व नोंदणी विभागाने 'एक जिल्हा, एक नोंदणी' या उपक्रमांतर्गत दुसऱ्या तालुक्यातील दुय्यम निबंधक कार्यालयात स्थावर मालमत्तेच्या दस्तांची नोंदणी करण्याच्या प्रक्रियेत महत्त्वाचे बदल केले आहेत. आता मालमत्ता एका तालुक्यात आणि दस्त नोंदणीचे कार्यालय त्याच जिल्ह्यातील दुसऱ्या तालुक्यात असल्यास, संबंधित नियमांनुसार पूर्वपरवानगीची प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. त्यामुळे जमीन, प्लॉट, घर किंवा अन्य स्थावर मालमत्तेचे खरेदी-विक्री व्यवहार करणाऱ्या नागरिकांनी नोंदणीपूर्वी नवीन प्रक्रियेची माहिती घेणे आवश्यक झाले आहे.

शासनाने दस्त नोंदणीची सुविधा नागरिकांना अधिक सुलभ व्हावी, वेळेची बचत व्हावी आणि नोंदणी प्रक्रियेत पारदर्शकता वाढावी, या उद्देशाने 'एक जिल्हा, एक नोंदणी' ही संकल्पना राबविली आहे. मात्र, या सुविधेचा लाभ घेताना दुसऱ्या तालुक्यातील कार्यालयात दस्त नोंदणीसाठी निर्धारित अटी व परवानगीची प्रक्रिया पाळावी लागणार आहे. त्यामुळे केवळ सोयीचे कार्यालय निवडले म्हणून थेट दस्त नोंदणी करता येईलच, असे नाही.

परवानगीसाठी अर्ज, कागदपत्रांची छाननी

दुसऱ्या तालुक्यातील दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त नोंदणी करायची असल्यास संबंधित कार्यालयाकडे आवश्यक कागदपत्रांसह परवानगीसाठी अर्ज सादर करावा लागेल. त्यानंतर दुय्यम निबंधकांकडून दस्त नोंदणीयोग्य आहे की नाही, याची प्राथमिक तपासणी केली जाईल. दस्त नियमानुसार नोंदणीस पात्र असल्याचे आढळल्यास आवश्यक अभिप्रायासह प्रस्ताव सह जिल्हा निबंधकांकडे पाठविण्यात येईल. प्रसिद्ध सूचनेनुसार, दस्त नोंदणीयोग्य असल्यास दोन दिवसांच्या आत प्रस्ताव सादर करण्याची प्रक्रिया नमूद करण्यात आली आहे. त्यानंतर सह जिल्हा निबंधक प्रस्तावाची छाननी करून नियमानुसार परवानगीबाबत निर्णय घेतील. मात्र, प्रत्यक्ष दस्त नोंदणीच्या वेळीही संबंधित दुय्यम निबंधकांकडून आवश्यक कागदपत्रे आणि कायदेशीर बाबींची पडताळणी केली जाणार आहे.

बाजारमूल्यापासून आरक्षणापर्यंत होणार तपासणी

दुसऱ्या तालुक्यात नोंदणीसाठी अर्ज आल्यास केवळ कागदपत्रांची पूर्तता झाली आहे की नाही, एवढीच तपासणी होणार नाही. संबंधित मालमत्तेचे बाजारमूल्य, मुद्रांक शुल्क, नोंदणी फी, दुसऱ्या तालुक्यात दस्त सादर करण्यामागील कारण, मालमत्तेशी संबंधित आरक्षण आणि संभाव्य कायदेशीर अडचणी अशा विविध बाबींचा विचार केला जाणार आहे.

यामुळे मालमत्तेच्या व्यवहारात नियमांचे पालन होत आहे की नाही, याची खातरजमा करण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर नागरिकांनी दस्त नोंदणीसाठी अर्ज करताना व्यवहाराशी संबंधित माहिती अचूक देणे आणि आवश्यक कागदपत्रे जोडणे महत्त्वाचे ठरणार आहे.

काही दस्तांना प्रक्रियेतून सूट

शासनाच्या सूचनेनुसार रेरा नोंदणीकृत प्रकल्पांशी संबंधित काही करारनामे व खरेदीखते तसेच विशिष्ट प्रकारच्या दस्तांना स्वतंत्र परवानगीच्या प्रक्रियेतून सूट देण्यात आली असल्याचे नमूद आहे. मात्र, ही सूट सर्व प्रकारच्या दस्तांना लागू होत नाही. त्यामुळे आपला दस्त अपवादाच्या श्रेणीत येतो की नाही, याची खात्री संबंधित दुय्यम निबंधक कार्यालयाकडून आणि लागू शासन परिपत्रकातून करून घेणे आवश्यक आहे.

परवानगी मिळाली म्हणजे नोंदणी निश्चित नाही!

या बदलातील महत्त्वाची बाब म्हणजे दुसऱ्या तालुक्यातील कार्यालयात दस्त नोंदणी करण्यासाठी मिळणारी परवानगी आणि प्रत्यक्ष दस्ताची नोंदणी या



स्वतंत्र प्रक्रिया आहेत. परवानगी मिळाल्यानंतरही दस्ताची वैधता, आवश्यक कागदपत्रे, मुद्रांक शुल्क आणि इतर कायदेशीर बाबींची तपासणी केली जाणार आहे. त्यामुळे परवानगी मिळाली म्हणजे दस्ताची नोंदणी निश्चित झाली, असा समज नागरिकांनी करून घेऊ नये.

दलालांच्या माहितीवर विसंबू नका; अधिकृत खातरजमा करा

जमीन, प्लॉट, घर किंवा अन्य स्थावर मालमत्ता खरेदी-विक्री करताना नागरिकांनी व्यवहार अंतिम करण्यापूर्वी संबंधित नोंदणी कार्यालयाशी संपर्क साधावा. आवश्यक कागदपत्रे, परवानगीची प्रक्रिया, लागू शुल्क आणि दस्ताला असलेले अपवाद यांची माहिती घ्यावी. विशेषतः व्यवहारासाठी आगाऊ रक्कम देण्यापूर्वी नोंदणीची प्रक्रिया स्पष्ट करून घेणे हितावे ठरणार आहे.

एक जिल्हा, एक नोंदणी, या उपक्रमामुळे जिल्ह्यातील विविध कार्यालयांत दस्त नोंदणीची सुविधा उपलब्ध होत असली, तरी नव्या प्रक्रियेतील अटींकडे दुर्लक्ष केल्यास व्यवहारात विलंब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिकांनी अधिकृत नियमांची माहिती घेऊनच पुढील पाऊल उचलावे, असे आवाहन या बदलाच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाचे ठरते.

थोडक्यात

नवरात्रीत बल्लारपूर पोलिसांची सलग तिसरी कारवाई : दारूच्या नशेत तलवार घेऊन दहशत निर्माण करणारा तरुण ताब्यात

दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर-धनंजय पांढरे

नवरात्रोत्सवाच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी गस्त घालणाऱ्या बल्लारपूर पोलिसांनी सलग तिसरी कारवाई केली. बालाजी वाडॉत दारूच्या नशेत हातात धारदार तलवार बाळगून नागरिकांमध्ये दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याच्या संशयावरून अजित स्वयंवरसिंग ठाकूर (वय २७), रा. बी.टी.एस. प्लॉट, शिवाजी वार्ड, बल्लारपूर याला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडून लोखंडी तलवार जप्त करण्यात आली. १५ ऑक्टोबर रोजी पोलीस उपनिरीक्षक उमेश दिगंबर जोगदंड हे पोलीस पथकासह नवरात्रोत्सवानिमित्त गस्त घालत असताना त्यांना संबंधित तरुणाबाबत गोपनीय माहिती मिळाली. पोलिसांनी पंचांना सोबत घेऊन घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांचे पथक दिसताच संशयिताने हातातील तलवार बाजूला फेकून दिली. मात्र, पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन तलवार जप्त केली.या प्रकरणी भारतीय हत्यार कायद्याच्या कलम ४ व २५ तसेच महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ८५(१) अन्वये गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया करण्यात आली. सदर कारवाई पोलीस निरीक्षक बिपिन इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक उमेश जोगदंड, पोहवा सत्यवान कोटनाके, विकास जुमनाके, पोअं महेश कुकुडकर, शांतकुमार घोसे, संदीप थेरे यांनी केले.



केंद्रप्रमुख चंद्रकांत रोकडे सरांचा सत्कार

नवरात्रोत्सवानिमित्त विद्यार्थ्यांना पंचपक्वान्नाचे भोजन



दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, वडगाव गुजर येथे केंद्रप्रमुखपदी पदोन्नती झाल्याबद्दल चंद्रकांत रोकडे सरांचा शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. सरपंच रुपालीताई लकडे, ग्रामसेविका डीलेश्वरी मोहझरे, पांडुरंग लोडे, ग्रामपंचायत सदस्य पौर्णिमा भोंग व शुभांगी सुरसकर यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला. नवरात्रोत्सवानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांना पंचपक्वान्नाचे भोजन व भेटवस्तू देण्यात आल्या. विद्यार्थिनी वेदिका निखाडे, गौरी कुसराम, समृद्धी दिवे व आरुषी तेलतुमडे यांनी मनोगत व्यक्त केले. आकांक्षा निखाडे व पूजा शिवरकर यांनी सूत्रसंचालन केले. मुख्याध्यापक अवधेश तिवारी यांनी प्रास्ताविक, तर विद्यार्थी दक्ष निमकर याने आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाला शिक्षक, स्वयंसेविका व शाळा व्यवस्थापन समितीच्या महिला सदस्य उपस्थित होत्या.

पीएम श्री जि.प. उच्च प्राथमिक शाळा देहेगाव येथे वाचन प्रेरणा दिन व जागतिक हात धुवा दिन साजरा



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, देहेगाव येथे गुरुवार (ता. १५ऑक्टोबर) रोजी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंती निमित्त वाचन प्रेरणा दिन व जागतिक हात धुवा दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धानला केंद्राचे केंद्रप्रमुख राजू आंबीलकर होते, तर प्रमुख उपस्थिती म्हणून शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नितेश इंगळे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक वासुदेव भुते यांनी केले. त्यांनी वाचनाचे व स्वच्छतेचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाचे संचालन प्रज्ञा रामटेके मॅडम यांनी केले. याप्रसंगी शिक्षकवृंद सुधीर कांबळे, शसुधीर खंडाईत, राजेश रोहाड, सुजाता बोदेले, संगीता आंबीलदुके,ज्योती आंबिलदुके, उमेश उके, पुष्पलता उके, रंजना उके यांनी विशेष सहकार्य केले. शिक्षिका सुजाता बोदेले यांनी आभार प्रदर्शन केले.

पुस्तक प्रकाशन सोहळा आज

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

स्व. रामाजी बारहाते सामाजिक विकास व शिक्षण संस्था नागपूर आर बी प्रकाशन नागपूर यांच्यावतीने मातृ सेवा संघ सिताबर्डी नागपूर येथे रंजन सभागृह येथे १८ ऑक्टोबर रोजी, दुपारी ३:३० वाजता. प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी अध्यक्ष अंबादासजी मोहिते यांच्या नेतृत्वात हा कार्यक्रम पार पडणार आहे. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी पाहुणे म्हणून जेष्ठ स्वतंत्र सेनानी लिलाताई चितळे यांची प्रामुख्याने उपस्थिती राहतील. याप्रसंगी विशेष अतिथी मंगलाताई पात्रीकर आणि विशेष उपस्थिती ज्योतीताई मोहिते यांची सुद्धा उपस्थिती राहतील. असे आर. बी पब्लिकेशनचे दिलीपराव बारहाते यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

नागपूर शहरालगतच्या १२ गावांना पाणीपुरवठ्याबाबत मोठा दिलासा

मजीप्रा संचालक मंडळाची 'ठोक पाणीपुरवठ्या'ला मान्यता शहरालगतच्या सुमारे एक लाख नागरिकांना मिळणार लाभ पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सततच्या पाठपुराव्याला यश

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर शहरालगतच्या (पेरी अर्बन) १२ गावांमधील पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागला आहे. महसूलमंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या (मजीप्रा) संचालक मंडळ बैठकीत 'ठोक पाणीपुरवठा पद्धती'च्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे.

नागपूर महानगरपालिका क्षेत्र आणि पेरी अर्बन भागातील पाणीपुरवठ्यामध्ये असलेल्या दरांच्या तफावतीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून तक्रारी येत होत्या. यावर तोडगा काढण्यासाठी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी २३ जानेवारी २०२५ रोजी आढावा बैठक घेऊन सातत्यपूर्ण पाठपुरावा केला, तसेच पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडे बैठका घेऊन मागणी लावून धरली होती. अखेर या प्रस्तावाला मंजुरी मिळाली आहे. या निर्णयामुळे परिसरातील ३ नगरपंचायती आणि ९ ग्रामपंचायतींमधील सुमारे एक लाख नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत यापूर्वी थेट ग्राहकांपर्यंत (किरकोळ स्वरूपात) पाणीपुरवठा केला जात होता. आता नव्या पद्धतीनुसार प्राधिकरणामार्फत थेट स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उंच जलकुंभांपर्यंत (पाण्याच्या टाक्यांपर्यंत) ठोक स्वरूपात पाणी पोहोचवले जाईल. यामुळे पाणीपुरवठ्याचा खर्च नियंत्रित राहील आणि नागरिकांवरील आर्थिक भार कमी होऊन त्यांना मोठा दिलासा मिळेल.

लाभ मिळणारी १२ गावे

▶ नगरपंचायत बेसा : बेसा, बेलतरोडी, पिपळा, घोगली.

▶ नगरपंचायत बहादुरा : बहादुरा, खरबी, गोन्ही सिम.

▶ नगरपंचायत बिडगाव : बिडगाव, तरोडी (बु.).

▶ ग्रामपंचायती : हुडकेश्वर (खुर्द), शंकरपूर आणि कापसी (खुर्द).

नवी पाणी वितरण व्यवस्था कशी असेल ?

स्थानिक संस्थांमार्फत वितरण : मजीप्रा थेट पाण्याचा टाक्यांपर्यंत पाणी पोहोचवेल. तिथून पुढे स्थानिक ग्रामपंचायती किंवा नगरपंचायती नागरिकांना घरगुती नळाद्वारे पाणी वितरित करतील.

स्मार्ट फ्लो मीटर आणि ऑटोमेशन : पाण्याचा अचूक हिशोब ठेवण्यासाठी प्रत्येक पाण्याच्या टाकीवर आयओटी आधारित 'स्मार्ट फ्लो मीटर' बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे.

सौरऊर्जा प्रकल्पाचा विचार : विजेचा खर्च कमी करून पाण्याचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी पीपीपी तत्त्वावर सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

करारनामा व वसुली : या नवीन व्यवस्थेचा लाभ घेण्यासाठी संबंधित ग्रामपंचायती व नगरपंचायतींना मजीप्रासोबत अधिकृत करार करावा लागेल तसेच नियमित व थकीत पाणीपट्टी भरणे बंधनकारक राहील.

"नागपूर शहरालगतच्या पेरी अर्बन क्षेत्रातील नागरिकांना समान आणि परवडणाऱ्या दरात शुद्ध पाणी मिळवून देणे ही आमची प्राथमिकता होती. पूर्वी जलजीवन प्राधिकरणामार्फत थेट नागरिकांपर्यंत पाणीपुरवठा केला जायचा, तर नागपूर महानगरपालिका क्षेत्रात वेगळी व्यवस्था होती. या तफावतीमुळे नागरिकांवर आर्थिक ताण येत होता.

प्राधिकरणाच्या संचालक मंडळाने ठोक पाणीपुरवठा पद्धतीला मान्यता दिल्यामुळे आता या १२ गावांमधील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. जनतेच्या हितासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी आमचे सरकार कटिबद्ध आहे." असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

लोकमान्य कन्या विद्यालयात वाचन प्रेरणा दिवस संपन्न

दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा : लोकमान्य कन्या विद्यालयात भूतपूर्व राष्ट्रपती, महान वैज्ञानिक, भारतरत्न डॉ.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, वाचन संस्कृतीला प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने ईपी क्लास प्रकल्प अंतर्गत वाचन व विशेष प्रदर्शनी या उपक्रमांचे आयोजन केले गेले. दहावीच्या वीस विद्यार्थिनींनी प्रेरक पुस्तकातील काही भागाचे एक तास वाचन करून डॉ. कलाम यांना अभिवादन केले. प्रकल्प संयोजक राघवेंद्र अडोणी यांनी डॉ.अब्दुल कलाम यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. या प्रसंगी विद्यार्थीनींनी तयार केलेल्या विविध विषयांवरील माहितीचे संकलन असणाऱ्या प्रकल्प वह्यांची विशेष प्रदर्शनी मांडण्यात आली होती. शाळेच्या मुख्याध्यापिका स्मिता धोपटे, शिक्षक - कर्मचारी तसेच विद्यार्थिनी यांनी प्रदर्शनीला भेट देऊन समाधान व्यक्त केले. विद्यार्थिनींनी संकलित केलेला मजकूर आकर्षक तसेच वाचनीय असल्यामुळे प्रकल्प वह्या सर्वांचे लक्ष वेधून घेत होत्या.



धंतोलीच्या दुर्गापूजा मंडपात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतले दुर्गादेवीचे दर्शन

बंगाली असोसिएशन आणि बंगाली एज्युकेशन सोसायटीच्या संयुक्त आयोजनाला मुख्यमंत्र्यांची भेट, दुर्गापूजेच्या ११६ व्या वर्षानिमित्त धार्मिक उत्साह

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी, १७ ऑक्टोबर रोजी, धंतोली येथील दुर्गापूजा मंडपाला भेट देऊन श्री श्री दुर्गादेवीचे दर्शन घेतले आणि देवीचे आशीर्वाद घेतले. बंगाली असोसिएशन आणि बंगाली एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या दुर्गापूजा उत्सवाचे यंदा ११६ वे वर्ष आहे. या निमित्ताने आयोजित धार्मिक सोहळ्यात मुख्यमंत्र्यांची उपस्थिती विशेष महत्त्वाची ठरली.

धंतोली येथील बंगाली असोसिएशन आणि बंगाली एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी दुर्गापूजा उत्सवाचे आयोजन करण्यात येते. बंगाली समाजाच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि पारंपरिक वारशाचे जतन करणारा हा उत्सव नागपूरच्या सांस्कृतिक परंपरेतील एक महत्त्वाचा भाग मानला जातो. यंदादी दहा दिवसीय दुर्गापूजा उत्सवाच्या निमित्ताने परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. देवीच्या दर्शनासाठी भाविकांची उपस्थिती आणि विविध धार्मिक कार्यक्रमांमुळे उत्सवाला विशेष रंगत आली आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मंडपात आगमन झाल्यानंतर बंगाली असोसिएशनचे अध्यक्ष प्रदीप मैत्र, महासचिव विद्युत चक्रवर्ती, बंगाली एज्युकेशन सोसायटीचे महासचिव प्रदीप गांगुली आणि संस्थेचे कोषाध्यक्ष सुजित सेनगुप्ता यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी दोन्ही संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांनी दुर्गादेवीचे दर्शन घेतल्यानंतर बंगाली असोसिएशन आणि बंगाली एज्युकेशन सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला.

या भेटीदरम्यान संस्थांच्या कार्यकर्त्यांशी तसेच पदाधिकाऱ्यांशी त्यांनी आपुलकीने चर्चा केली. याप्रसंगी संस्थेचे ज्येष्ठ सदस्य मंटा (अजित) बोस, रंजित रे, गौतम मित्र आणि संजीब चौधरी यांचीही उपस्थिती होती. धंतोली येथील दुर्गापूजा उत्सवाला ११६ वर्षांची परंपरा लाभली असून, या माध्यमातून बंगाली समाजाची धार्मिक श्रद्धा, सांस्कृतिक मूल्ये आणि सामाजिक एकात्मतेची भावना जपली जात आहे. अनेक वर्षांपासून सुरू असलेली ही परंपरा नागपूरच्या सांस्कृतिक वैविध्यात महत्त्वपूर्ण योगदान देत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीमुळे यंदाच्या दुर्गापूजा उत्सवाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

रोजगार, शिक्षण क्षेत्राचे बळकटीकरणासाठी पुन्हा संधी द्या : अभिजित वंजारी

कामठी आणि नागपुरात काँग्रेस, माविआच्या आढावा बैठका

दै. सिंहवाणी वृत्त, कामठी/नागपूर

मागील सहा वर्षांत रोजगारनिर्मिती, शिक्षण क्षेत्राचे बळकटीकरण आणि डिजिटायझेशन या क्षेत्रांत भरीव कार्य केले आहे. या कामाला अधिक गती देऊन पदवीधर व शिक्षकांचे प्रश्न प्रभावीपणे सोडविण्यासाठी पुन्हा एकदा नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघातून संधी द्यावी, असे आवाहन महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अभिजित गोविंदराव वंजारी यांनी केले. नागपूर येथील श्रीनगर, नंदनवन तसेच कामठी येथे आयोजित आढावा बैठकांमध्ये ते बोलत होते. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार), शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई गट), विमाशि तसेच विविध शिक्षक व कर्मचारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आगामी निवडणूक प्रचाराचा आढावा घेण्यात आला.



कामठी येथील कुसुमताई संगेवार सभागृह, कळमना रोड येथे झालेल्या बैठकीस माजी मंत्री सुनीलजी केदार, रामटेक लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्यामकुमार बर्वे, माजी मंत्री राजेंद्र मुळक, नागपूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष अश्विन बैस, माजी उपसभापती अर्वातिकाताई लेकुरवाळे, नागपूर जिल्हा निरीक्षक रविंद्रजी दरेकर, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे महासचिव शकुरभाई नागानी, माजी जिल्हा परिषद सदस्य सरिताताई रंगारी, शिवसेना (उबाठा) उपाध्यक्ष राधेश्याम हटवार, नगरसेवक साजिदभाई आणि महेशजी गिरी यांची प्रमुख उपस्थिती होती. नंदनवन येथील श्रीनगर परिसरात झालेल्या बैठकीस सामाजिक कार्यकर्ते राकेशजी कनोजे, विजुभाऊ वनवे, अमोल आखरे, आखरे काकाजी, विदर्भ प्राथमिक शिक्षक संघाचे भूषणजी तल्हार तसेच माजी नगरसेविका नयनताई झाडे उपस्थित होत्या.

दोन्ही बैठकांमध्ये पदवीधर व शिक्षकांच्या विविध प्रश्नांवर, शिक्षण क्षेत्रातील आव्हानांवर, संघटनात्मक बांधणीवर आणि आगामी निवडणुकीच्या नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रचार यंत्रणा अधिक सक्षम करणे, विविध संघटनांमध्ये समन्वय साधणे आणि मतदारांपर्यंत विकासकामांची माहिती पोहोचविणे यावरही भर देण्यात आला. गेल्या सहा वर्षांत केलेल्या कामाच्या बळावर आगामी काळातही रोजगार, शिक्षण आणि तंत्रज्ञानाधारित सुविधांच्या विस्तारासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार अभिजित वंजारी यांनी व्यक्त केला. पदवीधरांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आणि त्यांच्या प्रश्नांना विधिमंडळात प्रभावीपणे वाचा फोडण्यासाठी पुन्हा संधी देण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.०' अंतर्गत नागपूर जिल्ह्यात ५० मेगावॅटची स्थापित क्षमता यशस्वीरीत्या साध्य

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्राला शाश्वत आणि आत्मनिर्भर ऊर्जेची जोड देण्यासाठी राज्य शासनाने सुरू केलेल्या अतिशय महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' अंतर्गत नागपूर जिल्ह्याने ५० मेगावॅटचा महत्त्वपूर्ण टप्पा पार केला आहे. जिल्ह्यात ५० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प यशस्वीरीत्या प्रस्थापित करून महावितरण आणि स्थानिक प्रशासनाने ग्रामीण भागात ऊर्जा क्रांतीची नवी पहाट आणली आहे. यामुळे जिल्ह्यातील सुमारे १६ हजार शेतकऱ्यांना आता रात्रीच्या अंधारात किंवा बिकट परिस्थितीत सिंचन करण्याची गरज उरणार नसून, त्यांना दिवसा आणि पूर्ण दाबाने अखंडित वीजपुरवठा उपलब्ध होण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

गेल्या अनेक दशकांपासून शेतीसाठी रात्रीच्या वेळी मिळणाऱ्या विजेमुळे शेतकऱ्यांना वन्यजीवांचा धोका, साप-विंचवांची भीती आणि रात्रीच्या वेळी शेतात पाणी भरताना अनेक संकटांचा सामना करावा लागत होता. मात्र, राज्य सरकारच्या या विशेष उपक्रमामुळे ही अडचण कायमची दूर होण्याच्या दिशेने नागपूर जिल्ह्याने भक्कम पाऊल उचलले आहे. महावितरणच्या उपकेंद्रांनजीक विकेंद्रित स्वरूपात उभारण्यात आलेल्या या १० सौर ऊर्जा प्रकल्पांमुळे ५० मेगावॅटची हरित ऊर्जा थेट कृषी वाहिन्यांमध्ये जोडली जात आहे.



यामुळे वीज वहनादरम्यान होणारा अपव्यय टाळता येत असून स्थानिक पातळीवरच गुणवत्तेचा वीजपुरवठा करणे शक्य झाले आहे.

या योजनेची अंमलबजावणी केवळ विजेपुरती मर्यादित न राहता ती ग्रामीण अर्थव्यवस्थेला उभारी देणारी ठरत आहे. सौर प्रकल्पांसाठी जमिनी देणाऱ्या स्थानिक शेतकऱ्यांना आणि जमीन मालकांना या माध्यमातून प्रतिहेक्टरी आकर्षक वार्षिक भाडेतत्त्वाचा निश्चित मोबदला मिळत आहे. नागपूर जिल्ह्यातील या प्रकल्पांमुळे शेतकऱ्यांना एक हक्काचा, सुरक्षित उत्पन्नाचा स्रोत मिळाला आहे. ५० मेगावॅटची ही प्रस्थापित क्षमता साध्य करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात आणि अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला आणि मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात नागपूर जिल्ह्याचे मुख्य अभियंता राजेश नाईक व नागपूर ग्रामीण मंडळाचे अधीक्षक अभियंता संजय वाकडे, नागपूर जिल्हा प्रशासन, सौर ऊर्जा विकासक आणि स्थानिक शेतकऱ्यांचा समन्वय अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे.

पर्यावरणाच्या दृष्टीनेही हा प्रकल्प नागपूर जिल्ह्यासाठी वरदान ठरत आहे. पारंपरिक औष्णिक विजेवरील अवलंबित्व कमी करून स्वच्छ, हरित आणि प्रदूषणमुक्त सौर विजेचा वापर वाढल्याने हजारो टन कार्बनचे उत्सर्जन रोखण्यास मदत होणार आहे. 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.०' ही केवळ वीज निर्मितीची योजना नसून, ती बळीराजाच्या जीवनात प्रकाश आणि समृद्धी आणणारी एक सामाजिक-आर्थिक क्रांती ठरत आहे.

नागपूर जिल्ह्यातील येनवा, कचारीसावंगा, भारसिंगी, सावरगाव, कळमेशवर, कुही, रामटेक, चिकलापार, उमरेड आणि वडविहिरा येथील ३३/११ केव्ही उपकेंद्रावर उभारण्यात आलेल्या या अकुण ५० मेगावॅट सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाचे हे यश नागपूर जिल्ह्याला ऊर्जेच्या बाबतीत स्वावलंबी बनवणारे असून, यामुळे सुमारे १६ हजार शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज उपलब्ध झाली अहे. आगामी काळात १०० टक्के कृषी वाहिन्यांचे सौरीकरण करण्याच्या महावितरणच्या ध्येयाला यामुळे मोठी गती मिळाली आहे.

थोडक्यात

वरोरा तालुक्यातील उखर्डा येथे मोफत आरोग्य तपासणी व औषध वाटप शिबिर



दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा-धर्मेंद्र शेरकुरे

तालुक्यातील उखर्डा येथे सामाजिक कार्यकर्ते अभिजित कुडे, हेल्पएज इंडिया आणि GMR वर लक्ष्मी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी व औषध वाटप शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिराला गावातील १५० ते २०० नागरिकांनी, विशेषतः ज्येष्ठ नागरिकांनी उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला व आरोग्य सेवांचा लाभ घेतला. सतत विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजाची सेवा करणारे अभिजित कुडे यांच्या विशेष पुढाकाराने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. या आरोग्य शिबिरात ताप, सर्दी, खोकला, बी.पी. (रक्तदाब), शुगर (मधुमेह), तसेच त्वचा रोग (खाज) यांसारख्या विविध आजारांची सखोल तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर रुग्णांना मोफत औषध वाटपसुद्धा करण्यात आले.

हेल्पएज इंडिया फाउंडेशनच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यासाठी आणि कल्याणासाठी नियमितपणे अशा विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. या शिबिरादरम्यान अभिजित कुडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "ज्येष्ठ नागरिकांचे आरोग्य जपणे आणि त्यांना वेळीच योग्य वैद्यकीय मदत व मार्गदर्शन मिळवून देणे हे आपले सामाजिक कर्तव्य आहे. वापुढील काळातही नागरिकांच्या आरोग्यासाठी आणि सामाजिक हितासाठी असे उपक्रम सातत्याने राबवले जातील." हे शिबिर यशस्वी करण्यासाठी हेल्पएज इंडिया व GMR वरलक्ष्मी फाउंडेशनच्या चमूतील डॉक्टर विनय कुंभरे, फार्मसिस्ट वैभव देते, रशेदा शेख आणि संदीप काळे यांनी विशेष परिश्रम घेतले व रुग्णांची आस्थेने तपासणी केली.

नाट्य परिषद करंडक एकांकिका स्पर्धेची प्राथमिक फेरी उत्साहात संपन्न



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने आयोजित नाट्य परिषद करंडक एकांकिका स्पर्धेची प्राथमिक फेरी आज नागपुरात उत्साहात संपन्न झाली. अखिल भारतीय विश्वकर्मामय विकास मंडळ, ग्रेट नाग रोड, जगनाडे चौक, नागपूर येथे सायंकाळी ५.३० वाजता या स्पर्धेला सुरुवात झाली. या प्राथमिक फेरीत ओमेगा - बिर्याण्ड ह्युमन (देवरावजी कुबडे सेवा प्रतिष्ठान, नागपूर), शेरलॉक होम्स (देवरंजन बहुउद्देशीय संस्था, नागपूर), द रोड शो (चंद्ररथ थिएटर्स, नागपूर), जिंदगी (स्वानंद सांस्कृतिक मंडळ, नागपूर), या एकांकिकांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेचे उद्घाटन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नागपूर शाखेचे अध्यक्ष अजय पाटील, नाट्य परिषदेचे मध्यवर्ती उपाध्यक्ष नरेश गडेकर आणि मध्यवर्तीचे कार्यवाह सतीश लोटके, मध्यवर्तीचे कार्यकारिणी सदस्य संजय रहाटे यांच्या शुभहस्ते झाले. याप्रसंगी स्पर्धेचे परीक्षक म्हणून सोलापूरचे अमीर तडवळकर आणि मुंबईचे श्रीनिवास नार्वेकर, नागपूर शाखेचे उपाध्यक्ष किशोर डाऊ उपस्थित होते. स्पर्धेचे स्थानिक समन्वयक म्हणून डॉ. रवींद्र भुसारी यांनी जबाबदारी सांभाळली. मराठी रंगभूमीवरील नव्या कलावंतांना आणि हौशी नाट्यसंस्थांना आपली कलात्मक गुणवत्ता सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या या स्पर्धेमुळे नागपूरसह विदर्भातील एकांकिका चळवळीला प्रोत्साहन मिळत आहे.

खापरखेडा-देहगाव मार्गावर भीषण अपघात, गरबा पाहून परतणाऱ्या तीन मजुरांना धडक, दोघे गंभीर-एक जखमी

दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

खापरखेडा-देहगाव मुख्य मार्गावरील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २४७ वर गुरुवारी रात्री साडेआठच्या सुमारास भीषण अपघात घडला. राम मंदिरात गरबा पाहून पायी परतणाऱ्या तीन मजुरांना भरधाव टाटा ४०७ वाहनाने जोरदार धडक दिली.या अपघातात दोन मजूर गंभीर जखमी झाले, तर एकाला किरकोळ दुखापत झाली. धडकेनंतर वाहन रस्त्यावरच उलटल्याने परिसरात खळबळ उडाली, मध्य प्रदेशातील बालाघाट येथील मूळ रहिवासी श्रवण मानसिंग मडावी, रवी परते आणि संबल परसराम टेकाम हे तिघे मजूर देहगाव येथील



कार्यालयात मुक्कामी होते. गुरुवारी रात्री ते राम मंदिरात गरबा पाहण्यासाठी गेले होते. गरबा पाहून पायी परतत असताना दत्तप्रभू लॉनसमोर मागून आलेल्या टाटा ४०७ (एमएच ४० बीएल १९५९) वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली, अपघाताच्या वेळी समोरून येणाऱ्या ट्रकच्या प्रखर प्रकाशाचा झोत टाटा ४०७ चालकाच्या डोळ्यांवर पडला. त्यातच महामार्गावर पथदिवे नसल्याने अंधारात पायी चालणारे मजूर चालकाला वेळीच दिसले नाहीत, ऐनवेळी मजूर समोर आल्याचे लक्षात येताच चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले.वाहनाने तिघांना धडक दिल्यानंतर ते रस्त्यावरच उलटले.या अपघातात श्रवण मडावी आणि रवी परते हे दोघे गंभीर जखमी झाले,तर संबल टेकाम याला किरकोळ दुखापत झाली.

घटनेची माहिती मिळताच खापरखेडा पोलिसांनी नागरिकांच्या मदतीने तिन्ही जखमींना देहगाव येथील न्यू लाईफ हॉस्पिटलमध्ये दाखल केले. खापरखेडा पोलीस पुढील तपास करीत आहेत.राष्ट्रीय महामार्गावर पथदिव्यांची व्यवस्था नसल्यामुळे रात्रीच्या वेळी वाहनचालकांसह पादचाऱ्यांनाही अपघाताचा धोका निर्माण होत आहे. या दुर्घटनेमुळे महामार्गावरील प्रकाशव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे,भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी महामार्गावर पुरेशी प्रकाशव्यवस्था करण्याची मागणी होत आहे.

दीक्षाभूमीवर यंदा गैरसोय होणार नाही, प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण करावी!

धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून पाहणी, ५ कि.मी परिसरात एआय सीसीटीव्हीची नजर, कायमस्वरूपी विकासासाठी १२५ कोटी रुपये उपलब्ध

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र स्मृतींशी जोडलेल्या दीक्षाभूमीवर धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दरवर्षी लाखो अनुयायी अभिवादनासाठी येतात. या पार्श्वभूमीवर यंदा अनुयायांची कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी प्रशासनाने सर्व आवश्यक व्यवस्था केली आहे. मागील वर्षी निर्माण झालेल्या त्रुटी दूर करून यंदा नियोजनबद्ध व्यवस्था उभारण्यावर भर देण्यात आला आहे, अशी माहिती महसूलमंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दीक्षाभूमीच्या पाहणीदरम्यान दिली. धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून दीक्षाभूमी परिसराची पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. बावनकुळे म्हणाले की, दीक्षाभूमी



ट्रस्ट आणि राज्य सरकार यांच्या समन्वयातून धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या कार्यक्रमासाठी आवश्यक व्यवस्था करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्त यांच्या समन्वयाने विविध सोयीसुविधा उभारण्यात आल्या आहेत. यापूर्वी या संदर्भात प्राथमिक बैठक घेण्यात आली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही आवश्यक सूचना दिल्या आहेत.

आचारसंहितेतही प्रत्यक्ष पाहणी करून उपाययोजना

निवडणूक आचारसंहिता लागू असल्यामुळे नियमित बैठका घेण्यावर मर्यादा असल्या, तरी प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक बाबींचा आढावा घेता येतो. त्यानुसार दीक्षाभूमी परिसराची पाहणी करण्यात आली असून, काही बाबी राहिल्या असतील तर त्या पुढील दोन दिवसांत पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल.

दीक्षाभूमीच्या कायमस्वरूपी विकासासाठी १२५ कोटी रुपये

दीक्षाभूमीच्या कायमस्वरूपी विकासासाठी सुमारे १२५ कोटी रुपये उपलब्ध झाले आहेत. दीक्षाभूमी ट्रस्टकडून अंतिम विकास आराखडा मंजूर करून परिसरातील शॉपिंग मॉल्स आणि अन्य ठिकाणीही आवश्यक व्यवस्था करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असे बावनकुळे यांनी सांगितले.

मागील वर्षी शेवटच्या दिवसापर्यंत काही ठिकाणी गैरव्यवस्था आणि अडचणी निर्माण झाल्या होत्या. यंदा अशा प्रकारची परिस्थिती उद्भवू नये, यासाठी विशेष काळजी घेण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही वासंदर्भात तीन वेळा सूचना दिल्या असून, प्रशासनाने कोणतीही कसूर ठेवू नये, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

दीक्षाभूमी परिसरावर एआय सीसीटीव्हीची नजर

दीक्षाभूमी परिसरातील सुरक्षा व्यवस्थेबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले की, संपूर्ण पोलीस प्रशासन सतर्क असून, सीसीटीव्हीच्या माध्यमातून परिसरावर देखरेख ठेवण्यात येणार आहे. दीक्षाभूमीच्या पाच किलोमीटर परिसरात एआय तंत्रज्ञानावर आधारित सीसीटीव्ही यंत्रणेचा माध्यमातून निगराणी ठेवली जाणार आहे. कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार करण्याचा प्रयत्न झाल्यास तो वेळीच लक्षात येऊन संबंधितांवर कारवाई करता येईल, अशी व्यवस्था करण्यात आली आहे.

नागपूरचे वैभव आणि देशभरातील आंबेडकरी अनुयायांचे श्रद्धास्थान असलेल्या दीक्षाभूमीवर कोणत्याही प्रकारची गैरव्यवस्था होऊ नये, हा प्रशासनाचा मुख्य उद्देश आहे. मागील वर्षी पावसामुळे काही अडचणी निर्माण झाल्या होत्या. यंदा अशा परिस्थितीतही अनुयायांची गैरसोय होऊ नये, यासाठी आवश्यक नियोजन आणि खबरदारी घेण्यात आल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

अभिजित कुडे यांच्या आक्रमक आंदोलनाच्या इशाऱ्यामुळे महावितरण नमले!

वरोरा तालुक्यातील शेतकऱ्यांना १२ तास सुरळीत वीज पुरवठा करण्याचे महावितरणचे आदेश!

दै. सिंहवाणी वृत्त
धर्मेंद्र शेरकुरे - वरोरा

वरोरा तालुक्यातील उखर्डा, नागरी, केळी, शेगाव, हिवरा, चिकणी, येवती, महाडोली यांसारख्या नागरी भागातील गावांमध्ये महावितरण कंपनीकडून ८ तास वीज पुरवठा करून उर्वरित वेळ लोड शेडिंग (वीज कपात) सुरू होती. आधीच दुष्काळ आणि विविध संकटांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना या तुटपुंज्या वीज पुरवठ्यामुळे पिकांना पाणी देणे कठीण झाले होते. या गंभीर समस्येची तातडीने दखल घेत अभिजित प्रभाकरराव कुडे यांनी शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत महावितरणविरोधात आक्रमक भूमिका घेतली.

शेतकऱ्यांना पूर्वीप्रमाणे पूर्ण १२ तास सुरळीत वीज पुरवठा करण्यात यावा, अन्यथा महावितरणच्या कार्यालयात थेट ठिय्या आंदोलन छेडले जाईल, असा थेट इशारा अभिजित कुडे यांनी दिला. विशेष म्हणजे महावितरणला अधिकृत निवेदन देण्यापूर्वीच वासंदभातील वृत्त वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाले. या बातमीमुळे महावितरण कंपनीचे धाबे दणाणले आणि प्रशासनाला तातडीने चक्र फिरवावी लागली.

अभिजित कुडे यांच्या या इशारा व आक्रमक भूमिकेपुढे शेवटी महावितरण कंपनीला नमते घ्यावे लागले. प्रशासनाने तातडीने वरोरा तालुक्यातील संबंधित गावांमध्ये शेतकऱ्यांना पूर्ववत १२ तास सुरळीत वीज पुरवठा करण्याचे स्पष्ट आदेश जारी केले आहेत.

महावितरणच्या या निर्णयामुळे ऐन संकटाच्या काळात बळीराजाला मोठा दिलासा मिळाला असून, परिसरातील शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलले आहे. लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांच्या या धडक कारवाईबद्दल तालुक्यातील शेतकऱ्यांनी अभिजित प्रभाकरराव कुडे यांचे विशेष आभार मानले आहेत.

दोन दुचाकींची समोरासमोर धडक; एक जागीच ठार तर ४ गंभीर जखमी

वृत्तसंस्था, नांदेड : पालाईगुडा फाट्यावजवळ दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन झालेल्या भिषण अपघात एक जण जागीच ठार झाला. तर ४ जण गंभीर जखमी झाल्याची घटना दि. १७ रोजी दुपारी बाराच्या सुमारास घडली. माहूरच्या घाटात शुक्रवारी अपघात होऊन तीन भाविक ठार झाल्याची घटना घडली होती. तोच शनिवार १७ रोजी हा दुसरा अपघात झाला आहे. केळापूर येथून दर्शन घेऊन सारखणी मार्गे गोंडवडसा येथे दुचाकी क्र एमएच २६ बीआर ९१५४ वरून गजानन शंकर आशेवाड वय २८, कुंदन किशोर बावणे वय ३०, अतुल रमेश बावणे २० हे तिघे जात होते.

तर माहूरवरून दर्शन करून दुसरी दुचाकी एमएच २९ एक्यू ९१४० वर असलेले बाळू गोपा जाधव वय ५५, आकाश प्रल्हाद जाधव वय ३७ हे दोघे रा. दराटी तालुका किनवट हे दोघेजण परत जात होते. या दोन्ही दुचाकींची पालाईगुडा फाटा येथे बारजवळ समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातात हे पाचही जण गंभीर जखमी होऊन रस्त्यावर पडले. ही माहिती मिळताच सपोनी संतोष जोंधळे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन स्थानिकांच्या मदतीने जखमींना दहेली तांडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. येथे वैद्यकीय अधिकारी डॉ. विजया जुने यांनी गजानन आशेवाड यांना मृत घोषित केले.

बुद्धवंदनेने निनादणार दीक्षाभूमी, आजपासून धम्मदीक्षेचा सोहळा

१८ ते २० ऑक्टोबरदरम्यान आयोजन, देश-विदेशातील अनुयायी घेणार धम्मदीक्षा


दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ऐतिहासिक धम्मक्रांतीची साक्ष देणारी पवित्र दीक्षाभूमी पुन्हा एकदा बुद्धवंदना आणि धम्माच्या मंगल स्वरांनी निनादणार आहे. देशाच्या कानाकोपऱ्यासह विदेशातून येणारे उपासक, उपासिका आणि अनुयायी तथागत गौतम बुद्धांचा धम्म स्वीकारण्यासाठी येथे एकवटणार आहेत. रविवार, १८ ऑक्टोबरपासून सुरू होणारा धम्मदीक्षेचा हा तीन दिवसीय सोहळा २० ऑक्टोबरपर्यंत चालणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमी आणि अखिल भारतीय भिक्खू संघाच्या सहकार्याने हा उपक्रम अनेक वर्षांपासून अव्याहतपणे सुरू आहे. दीक्षाभूमी स्मारक समितीचे अध्यक्ष तथा धम्मसेना नायक भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांनी याबाबत प्रसारमाध्यमांना माहिती दिली.

पहिल्या दिवशी रविवारला सकाळी ९.३० वाजता भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई बुद्धवंदना करून कार्यक्रमाची सुरुवात करतील. त्यानंतर उपासक-उपासिकांना भिक्खू संघाकडून धम्मदीक्षा दिली जाईल. दीक्षा ग्रहण करणाऱ्यांना प्रमाणपत्रांचेही वितरण करण्यात येणार आहे.

या सोहळ्याला भंते नागसेन, भंते प्रज्ञाबोधी, भंते धम्मविजय, भंते महानागा, भंते कुमारकश्यप, भंते धम्मप्रकाश, भंते नागप्रकाश, भंते नागानंद, भंते धम्मपाल, भंते बुध्ददीप, भंते कुशीनागा, भंते अनुत्तरबोधी, यांच्यासह भिक्खू संघातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.



मानवमुक्तीच्या विचारांची प्रेरणाभूमी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक धम्मक्रांतीची साक्षीदार असलेल्या दीक्षाभूमीला जगभरातील बौद्ध अनुयायांच्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. ग्रामीण भागापासून देशातील विविध राज्यांतील हजारो अनुयायी दरवर्षी येथे येऊन धम्मदीक्षा ग्रहण करतात. दीक्षाभूमी ही केवळ ऐतिहासिक स्थळ नसून समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि मानवमुक्तीच्या विचारांची प्रेरणाभूमी आहे. येथून मिळणारी ऊर्जा अनुयायांच्या जीवनाला सकारात्मक दिशा देते, असे भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांनी सांगितले.

वंजारींच्या विजयासाठी राष्ट्रवादी काँग्रेसनेही कंबर कसली

शरद पवार गटाचा जंगी मेळावा, जिल्ह्यातील नेत्यांनी केला विजयाचा निर्धार

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत काँग्रेस आणि महाविकास आघाडीचे उमेदवार अभिजित गोविंदराव वंजारी यांच्या विजयासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षानेही कंबर कसली आहे. नागपुरात आयोजित पक्षाच्या मेळाव्यात नागपूरसह पूर्व विदर्भातील विविध जिल्ह्यांतील नेते आणि पदाधिकाऱ्यांनी वंजारी यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचा निर्धार केला. सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एकजुटीने प्रचारात उतरून महाविकास आघाडीच्या विजयासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

या मेळाव्याला माजी गृहमंत्री



अनिल देशमुख, माजी मंत्री रमेश बंग, माजी आमदार विजय घोडमारे, दिनानाथ पडोळे, प्रकाश गजभिये, भंडारा जिल्ह्याचे माजी आमदार चरण वाघमारे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नागपूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष सलिल देशमुख, नागपूर शहराध्यक्ष दुनेश्वर पेठे, चंद्रपूर महिला जिल्हाध्यक्षा बेबीताई उईके, गडचिरोली जिल्हाध्यक्ष अतुल गणार, मोहम्मद शब्बीर विद्रोही, अँड. ठाकरे, गुड्डू बोपचे यांच्यासह विविध पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

अनिल देशमुख : विजयासाठी एकजुटीने प्रयत्न करा

पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या विजयासाठी सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एकदिलाने काम करण्याची गरज आहे. प्रत्येक पदवीधर मतदारापर्यंत महाविकास आघाडीची भूमिका पोहोचवावी. कार्यकर्त्यांनी मतदारांशी संपर्क वाढवून प्रचाराला गती द्यावी. अभिजित वंजारी यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावे, असे आवाहन माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी केले.

रमेश बंग : कार्यकर्त्यांनी प्रचाराची धुरा सांभाळावी

पदवीधर मतदारसंघाची निवडणूक जिंकण्यासाठी पक्ष संघटनेची ताकद महत्त्वाची आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सक्रिय होऊन मतदारांशी संपर्क वाढवावा. महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी समन्वयाने काम केल्यास विजयाचा मार्ग सुकर होईल. अभिजित वंजारी यांच्या विजयासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने आपली जबाबदारी प्रभावीपणे पार पाडावी, असे आवाहन माजी मंत्री रमेश बंग यांनी केले.

अभिजित वंजारी : पदवीधरांच्या प्रश्नांसाठी कटिबद्ध

पदवीधर मतदारसंघातील मतदारांच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. पदवीधर, युवक आणि रोजगाराशी संबंधित प्रश्नांवर सातत्याने काम करण्याचा आपला प्रयत्न राहिला आहे. आगामी काळातही पदवीधरांच्या हक्कांसाठी कार्यरत राहू. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेससह महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षांचे सहकार्य महत्त्वाचे असून, सर्वांनी एकजुटीने विजयासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन उमेदवार अभिजित वंजारी यांनी केले.

मेळाव्यात उपस्थित नेत्यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या विजयासाठी एकजुटीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. त्यामुळे नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने प्रचाराची तयारी अधिक तीव्र केल्याचे चित्र दिसून आले.

थोडक्यात

जागतिक अन्न दिनानिमित्त 'आपलं घर' वृद्धाश्रमात जनजागृतीपर कार्यक्रम संपन्न

संतुलित आहार, आरोग्य आणि ज्येष्ठांच्या सेवेतून सामाजिक बांधिलकीचा संदेश



दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे - सालेकसा

जागतिक अन्न दिनाचे औचित्य साधून एस.आर.बी. महिला महाविद्यालय, सालेकसा यांच्या वतीने सालेकसा येथील 'आपलं घर' वृद्धाश्रमात जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून वृद्ध माता व ज्येष्ठ नागरिकांना संतुलित आहार, पोषणमूल्ये, आरोग्यदायी जीवनशैली तसेच शारीरिक व मानसिक आरोग्याचे महत्त्व पटवून देण्यात आले. कार्यक्रमात महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. निखिला बी. परांजपे यांनी उपस्थित वृद्ध माता व ज्येष्ठ नागरिकांना मार्गदर्शन केले. दैनंदिन आहारात कोणत्या पदार्थांचा समावेश करावा, शरीराला आवश्यक पोषणमूल्ये कोणत्या अन्नपदार्थांतून मिळतात आणि वाढत्या वयानुसार आहाराची काळजी कशी घ्यावी, याविषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली. योग्य व संतुलित आहारामुळे आरोग्य चांगले राखण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले.

यावेळी पूर्ती बहुउद्देशीय संस्थेचे सचिव डॉ. राजेंद्र ह. बडोले यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. आरोग्यदायी जीवनासाठी योग्य आहार, नियमित दिनचर्या, शारीरिक स्वास्थ्यासोबत मानसिक आरोग्याची काळजी आणि सकारात्मक दृष्टिकोन महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले. ज्येष्ठ नागरिकांचा आदर करणे, त्यांना प्रेम व आपुलकी देणे आणि त्यांच्या गरजांची काळजी घेणे ही समाजातील प्रत्येकाची जबाबदारी असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. या उपक्रमादरम्यान 'आपलं घर' वृद्धाश्रमाचे संचालक महेंद्र रंगारी यांनी एस.आर.बी. महिला महाविद्यालयाच्या प्राध्यापक व विद्यार्थिनींनी वृद्धाश्रमाला भेट देऊन ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधल्याबद्दल महाविद्यालयाचे आभार मानले. अशा उपक्रमांमुळे वृद्धांना आपुलकीचा आधार मिळतो, तसेच समाजात सेवाभाव आणि सामाजिक जाणीव वाढीस लागते, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाला पूर्ती बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा शालिनीताई बडोले यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच महाविद्यालयाच्या गृहविज्ञान शाखेतील डॉ. सरस्वता बिसेन, कीर्ती वैद्य मॅडम, एकुलकर मॅडम, धकाते मॅडम, पायल मॅडम, अमित सर, शुभम सर आणि नागपुरे सर यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. जागतिक अन्न दिनानिमित्त आयोजित या उपक्रमातून 'संतुलित आहारातून निरोगी जीवन आणि ज्येष्ठांच्या सेवेतून समृद्ध समाज' असा प्रेरणादायी संदेश देण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये सामाजिक बांधिलकी, सेवाभाव आणि ज्येष्ठ नागरिकांप्रती आदराची भावना वृद्धिंगत होण्यास मदत झाली.

हातमागाला पुनर्वैभव मिळवून देण्याचे लक्ष्य : नितीन गडकरी

अभिनेत्री हेमामालिनींच्या हस्ते धापेवाडा टेक्सटाईलच्या नव्या इमारतीचे लोकार्पण, फॅशन शोमध्ये झळकल्या धापेवाडाच्या पारंपरिक साड्या







दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

पूर्वी प्रत्येक हलबा आदिवासी समाजाच्या घरात हातमाग होता; मात्र आता ही परंपरा संपण्याच्या मार्गावर आहे. हातमागाला पुन्हा वैभव मिळवून देण्यासाठी आणि या विणकर समाजाला रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी धापेवाडा टेक्सटाईल प्रकल्प सुरू करण्यात आला, असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले.

विदर्भातील पारंपरिक हातमाग उद्योगाला आधुनिक फॅशन, डिझाईन आणि व्यापक बाजारपेठेशी जोडण्याच्या दिशेने धापेवाडा टेक्सटाईल उद्योग प्रोड्यूसर कंपनी लिमिटेडच्या धापेवाडा (कळमेश्वर) येथे कंपनीच्या नूतन इमारतीचे लोकार्पण आणि हातमाग उद्योगाचा शुभारंभ शनिवारी सुप्रसिद्ध अभिनेत्री व खासदार हेमा मालिनी यांच्या हस्ते फित कापून करण्यात आला. केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक व राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडला.

नितीन गडकरी म्हणाले, २०२१ मध्ये या कामाची सुरुवात करून महिलांना प्रशिक्षण देण्यात आले. सुरुवातीला बाजारपेठेबाबत साशंकता होती; मात्र उत्पादनाचा दर्जा सुधारल्याने मागणी वाढली आहे. उत्पादन वाढविण्यासाठी गडचिरोली आणि वाशीम जिल्ह्यांत प्रकल्प सुरू करण्यात आले असून, भविष्यात खापा येथेही प्रकल्प सुरू करण्याची योजना आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आणि नियतींच्या माध्यमातून धापेवाडा टेक्सटाईलला जागतिक स्तरावर पोहोचविण्याचा प्रयत्न आहे. भविष्यात ५ हजार महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे लक्ष्य असल्याचेही नितीन गडकरी यांनी सांगितले. या कार्यक्रमाला केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरिराज सिंह, राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, डॉ. राजीव पोतदार, आमदार चरणसिंग ठाकूर, आमदार आशिष देशमुख, आमदार समीर मेघे, महापौर नीता ठाकरे, उपमहापौर लीला हाथीबेड यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविकातून सुधीर दिवे यांनी कंपनीच्या ७०० हून अधिक महिला सभासद असून, १०० हातमाग कार्यरत आहेत. येथे तसर सिल्क, सिल्क-कॉटन आणि कॉटन साड्यांची निर्मिती केली जाते. स्थानिक महिलांना प्रशिक्षण देऊन रोजगार उपलब्ध करून देण्यावर या प्रकल्पाचा भर आहे. डॉ. राजीव पोतदार स्वागतपर भाषणात म्हणाले, नितीन गडकरी यांच्या पुढाकारातून पारंपरिक विणकर महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा उद्देश असून या उपक्रमामुळे विणकर महिलांच्या आयुष्यात आनंदाचे नवे क्षण फुलले असून, त्यांच्या पारंपरिक कलेला रोजगाराची जोड मिळाली आहे. पार्थवी पवनीकर हिने गणेश वंदना सादर केली. सूत्रसंचालन रूपम व आसावरी देशपांडे-गलांडे यांनी केले. राजश्री बापट यांनी आभार मानले. प्रकल्प उभारणीसाठी मदत करणाऱ्या मान्यवरांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

हेमामालिनी यांना धापेवाडाची साडी भेट

हेमामालिनी यांनी प्रकल्पाच्या पाहणी केली. त्यांनी प्रकल्पाचे कौतुक केले. यादरम्यान त्यांना आवडलेली साडी नितीन गडकरी यांच्या हस्ते भेट देण्यात आली.

हेमामालिनी यांनी सर्वांना नवरात्रीच्या शुभेच्छा देत धापेवाडा टेक्सटाईल प्रकल्पाला भेट देऊन आनंद व्यक्त केला. नागपूरशी आपले जुने नाते असल्याचे सांगत त्यांनी नितीन गडकरी यांच्या नावीन्यपूर्ण उपक्रमांचे कौतुक केले. धापेवाडा टेक्सटाईलमुळे महिलांना रोजगार मिळत असून, फॅशन शोच्या माध्यमातून विविध प्रदेशांतील साड्यांना नवे व्यासपीठ मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

धापेवाडा प्रकल्प राहणार वस्त्रोद्योगातील मैलाचा दगड - केंद्रीय मंत्री गिरिराज सिंह

केंद्रीय मंत्री गिरिराज सिंह म्हणाले की, नितीन गडकरी हाती घेतलेले काम पूर्णत्वास नेतात. मग ते रस्ते असोत, कृषी क्षेत्र असो किंवा वस्त्रोद्योग. रोजगारनिर्मितीची मोठी क्षमता वस्त्रोद्योगात आहे. धापेवाडा प्रकल्प वस्त्रोद्योगातील महत्त्वाचा मैलाचा दगड ठरत आहे. तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात कामाचा वेग वाढविण्याची गरज आहे. या प्रकल्पामुळे विणकर समाजातील लोकांना वर्षभरात दरमहा २९ ते ३० हजार रुपयांचे उत्पन्न मिळू शकेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

धापेवाड्याच्या पारंपरिक कलेला देशभरात मिळेल बाजारपेठ : संजय सावकारे

संजय सावकारे म्हणाले, नितीन गडकरी यांनी धापेवाड्याला नवी ओळख मिळवून दिली. फॅशन शोच्या माध्यमातून पारंपरिक कलेच्या मार्केटिंगला चालना मिळेल. नागपूर विमानतळावरही पारंपरिक वस्तूंच्या विक्रीची सुविधा उपलब्ध व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

फॅशन शोमधून हातमाग साड्यांचे सौंदर्य

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण मुंबईतील मॉडेल्सनी सादर केलेला फॅशन शो ठरला. या शोमध्ये धापेवाडा टेक्सटाईलच्या पारंपरिक साड्या आधुनिक फॅशनच्या व्यासपीठावर सादर करण्यात आल्या. पारंपरिक करवताकाठी तसर सिल्क, सिल्क-कॉटन आणि पट्टी किनार कॉटन साड्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण रचना, रंगसंगती आणि कलात्मकतेने उपस्थितांचे लक्ष वेधले. या फॅशन शोमध्ये कॅडीएन्स अकादमीनेही सहभाग घेतला.मुंबईच्या मॉडेल्स सोबत धापेवाडा च्या वीणकर महिला मंचावर येताच टाळ्यांचा कडकडाट झाला.

या कार्यक्रमाला कांचनताई गडकरी, धापेवाडा टेक्सटाईल उद्योग प्रोड्यूसर कंपनीचे सुधीर दिवे, राजश्री बापट, दिलीप धोटे, किरण खडगी, दिलीप डाखोळे, प्रभू महाराज परते, गोविंदराव झोडे, गंगाधरराव नागपुरे, मिलिंद वेळेकर, ज्योती मानकर, सोना अंबोलीकर, सीमा साबळे आणि रुचिता परते, रमेश मानकर, सुरेश चिचघरे, कॅडीएन्स अकादमीचे रुपेश कुमार यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

सावनेर येथे घरफोडी, दोन लाखांचा मुद्देमाल लंपास



दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

सावनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अज्ञात चोरट्यांनी घराच्या मुख्य दरवा. जाचे कुलूप व कडीकोयंडा तोडून घरात प्रवेश केला. बेडरूममधील लोखंडी आलमारीत ठेवलेले सोन्या चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण दिड ते दोन लाख रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. प्राप्त माहितीनुसार, तक्रारदार सुशीला दशरथ मिश्रा (वय ६५ वर्ष), रा. रेल्वे स्टेशनमागे, वॉर्ड क्रमांक ३, सावनेर, जि. नागपूर, या शिलाई मशीन चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांचे पती दशरथ मिश्रा यांना अर्धांगवायू चा त्रास असल्याने त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.



तक्रारीनुसार, १३ ऑक्टोबर रोजी रात्री १२ वाजेपासून ते १४ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ७.३० वाजेच्या दरम्यान ही घरफोडी झाली. तक्रारदार यांच्या घरी कामानिमित्त आलेल्या आकाश मदन मिश्रा यांनी फोन करून घरफोडी झाल्याची माहिती दिली. त्यानंतर तक्रारदार यांनी घरी जाऊन पाहणी केली असता, घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप व कडीकोंडा तोडलेला दिसून आला.

घरातील बेडरूममधील लोखंडी आलमारीतील सामान अस्ताव्यस्त पडलेले होते. चोरट्यांनी आलमारीत ठेवलेले एक चांदीचे पायातील दागिन्यांचे जोडा, चांदीचे तोरड्या, चांदीची बिछवे आणि जुनी चांदीची मोड असा अंदाजे ७५० ग्राम चांदी चोरून नेली. याशिवाय, सोन्याच्या नवीन मणी, दोन सोन्याच्या अंगठ्या, सोन्याच्या झुमक्यांचा एक जोड, कानातील सोन्याचे टॉप्स, तसेच रोख १० हजार रुपये असा एकूण अंदाजे एक ते दोन लाख रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला.

घटनेनंतर तक्रारदार यांनी सावनेर पोलीस ठाण्यात तोंडी माहिती दिली. त्यानुसार पोलिसांत तक्रार नोंदविण्यात आली आहे. या घरफोडीमुळे परिसरात चिंता व्यक्त होत असून, अज्ञात चोरट्यांचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. शहरात ठीकठीकाणी ९१ सुरक्षा कॅमेरे, अद्यावत नियंत्रण कक्ष व पोलिसांची रात्रकालीन नाकाबंदी इवते सर्व असुन ही रात्रीच्या वेळी वाढते चोरीचे प्रमाण हे चिंतेचे विषय ठरत असुन स्थानिक पोलिसांचा गुन्हेगारी प्रवृत्तीवर वचक कमी असल्याचे बोलल्या जात आहे.

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमीवर अखंडित आणि सुरक्षित वीजपुरवठ्यासाठी महावितरण सज्ज



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

दीक्षाभूमीवर अवतरणाऱ्या लाखो बौद्ध अनुयायांच्या साक्षीने साजरा होणाऱ्या ऐतिहासिक ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त महावितरण प्रशासनाने चोख नियोजन केले असून, सोहळ्यादरम्यान अखंडित व सुरक्षित वीजपुरवठा राहावा यासाठी महावितरणची यंत्रणा पूर्ण ताकदीने सज्ज झाली आहे.

याच पार्श्वभूमीवर, शनिवार, दि. १७ ऑक्टोबर २०२६ रोजी शंकर नगर उपविभाग येथे महावितरणच्या शहर मंडलचे अधीक्षक अभियंता प्रफुल लांडे यांच्या अध्यक्षतेखाली आणि कार्यकारी अभियंता (काँग्रेस नगर विभाग) राहुल जीवतोडे यांच्या उपस्थितीत सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची या बैठकीत उपस्थिती होती. या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक १९ व २० ऑक्टोबर २०२६ रोजी दीक्षाभूमी परिसरात पार पडणाऱ्या सोहळ्यादरम्यान अखंडित व सुरक्षित वीज पुरवठा राखण्यासाठी कर्तव्यावर तैनात राहणाऱ्या प्रत्येकाला सोपवण्यात आलेली कर्तव्ये, तातडीच्या प्रसंगी करायचे व्यवस्थापन आणि सुरक्षेच्या उपाययोजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीनंतर लगेचच अधीक्षक अभियंता प्रफुल लांडे आणि कार्यकारी अभियंता राहुल जीवतोडे यांनी प्रत्यक्ष दीक्षाभूमी येथे भेट देऊन वस्तुस्थितीची पाहणी केली. सोहळ्याच्या मुख्य मंडपासह संपूर्ण परिसर, मुख्य प्रवेशद्वारे आणि आणीबाणीच्या सेवांसाठी उभारण्यात आलेल्या महावितरणच्या मुख्य 'सप्लाय पॉईंट्स', ३३ केव्ही दिक्षाभुमी उपकेंद्राचा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आढावा घेतला. या वेळी उपस्थित कर्मचाऱ्यांना विद्युत सुरक्षेसोबतच तांत्रिक अडथळे टाळण्यासाठी आणि वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महत्त्वाचे व मार्गदर्शक निर्देश देण्यात आले. यावेळी शंकरनगर उपविभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रशांत काकडे यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

लाखो भाविकांच्या उपस्थितीत साजरा होणारा हा भव्य सोहळा निर्विघ्न पार पाडण्यासाठी महावितरणचे अधिकारी व कर्मचारी रात्रंदिवस तत्पर राहणार असून, दीक्षाभूमी परिसरातील प्रकाशव्यवस्था व वीजपुरवठा सुरळीत व सुरक्षित ठेवण्यासाठी महावितरण सज्ज असल्याचे सुतोवाच त्यांनी केले.

प्लाज्मा शाळेच्या स्काउट्स गाईडनी घेतले आपत्ती व्यवस्थापनचे प्रशिक्षण

दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा :- सावनेर तालुक्यातील प्लाज्मा स्कूल आणि ज्यु. कॉलेज, खापरखेडा येथे राष्ट्रीय आपत्ती मोचन बल , अकॅडमी नागपूर यांच्या अंतर्गत आयोजित एक दिवसीय 'आपत्ती व्यवस्थापनचे प्रशिक्षण शिबिर' मध्ये शाळेच्या जवळपास २७० स्काउट्स आणि गाईड्स यांनी सहभाग घेतला. या एक दिवसीय 'आपत्ती व्यवस्थापनचे प्रशिक्षण शिबिर'मध्ये राष्ट्रीय आपत्ती मोचन बल, अकॅडमी नागपूरचे निरीक्षक जोगराज शर्मा, एच. सी. सुनिल रामटेके, एच. सी. नवीन जोशी, सी.टी./एम. काजल अलबतु, एफ. टी. जितेश सैन आणि अन्य प्रशिक्षक यांनी स्काउट्स गाईड्स यांना भूकंप, पूर स्थिती, प्रथमोपचारमध्ये, विविध प्रकारचे बैंडेजेस, कृत्रिम श्वास प्रणाली, फायर फाइटिंग, विविध प्रकारचे फ्लोटिंग डिवाइसेस , आगीचे प्रकार आणि अग्निशमक यंत्राचे प्रकार व त्यांचे तांत्रिक रित्या वापर करण्याची पद्धत, आपातकालीन परीस्थिती इत्यादी आपत्ती व्यवस्थापनच्या विषयांवर सविस्तर माहिती आणि प्रात्यक्षिक करून दाखविले.या प्रशिक्षण शिबिरासाठी, शाळेचे अध्यक्ष पृथ्वीराज बोरकर, मुख्याध्यापिका लैला वर्गीस, उपमुख्याध्यापिका तनुश्री भट्टाचार्य, स्काउट मास्टर शेखर कोलते, शिक्षिक वर्ग यांनी मोलाचे सहकार्य केले.



पॅलिएटिव्ह केअर आपल्याला अधिक माणुसकीने वागायला शिकवते : जेरी पिंटो

'अ गुड लाइफ : द पॉवर ऑफ पॅलिएटिव्ह केअर' या पुस्तकामागील अनुभव कथन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

'रुग्णाच्या इच्छा महत्त्वाच्या आहेत. रुग्ण महत्त्वाचा आहे. पॅलिएटिव्ह केअर म्हणजेच वेदनाशामक व सहायक उपचारपद्धती रुग्णाला एक माणूस म्हणून त्याचे महत्त्व अधोरेखित करून देते,' असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखक, कवी, अनुवादक आणि पत्रकार जेरी पिंटो यांनी केले.

विदर्भ लिटरेरी फाउंडेशन (व्हीएलएफ) च्या वतीने उत्तर अंबाझरी मार्गावरील इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स येथे 'इन कॉन्व्हर्सेशन विथ ऑथर जेरी पिंटो' या विशेष संवादात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात जीवघेण्या आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांचे जीवनमान सुधारण्यात पॅलिएटिव्ह केअरची भूमिका, तसेच त्यातील भावनिक, मानसिक आणि आध्यात्मिक पैलूंवर चर्चा झाली.

'अ गुड लाइफ : द पॉवर ऑफ पॅलिएटिव्ह केअर' या पुस्तकाच्या लेखनामागील अनुभव सांगताना पिंटो यांनी एका पॅलिएटिव्ह केअर केंद्रातील असाध्य आजाराने ग्रस्त असलेल्या मुलांची आठवण सांगितली. तेथील एका परिचारिकेने मुलांसाठी ग्रंथालय आणि त्यांना पुस्तके वाचून दाखवण्याच्या व्यक्तीची गरज असल्याचे सांगितले. त्यानंतर एका तरुणाने मुलांना पुस्तके



वाचून दाखवण्याची जबाबदारी स्वीकारली. मुलांनी त्याचे एखाद्या रॉकस्टारप्रमाणे स्वागत केले. छोट्या कृतीतूनही रुग्णांना आनंद आणि दिलासा मिळू शकतो, याची जाणीव या अनुभवातून झाल्याचे त्यांनी सांगितले.

एका बालरुग्णाला अखेरचा निरोप देतानाचा अनुभवही पिंटो यांनी कथन केला. या प्रसंगामुळे त्यांना मोठ्या भावनिक संघर्षातून जावे लागले. त्यानंतर पॅलिएटिव्ह केअर रुग्णांना कशा प्रकारे आधार देते, हे समजून घेण्यासाठी त्यांनी देशभरातील विविध केंद्रांना भेटी देण्याचे ठरवले. या भेटी वेदनादायी प्रवास न ठरता जीवनाकडे नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची संधी ठरल्या. केवळ तीन महिने आयुष्य शिल्लक असलेल्या सांगण्यात आलेल्या एका तरुणाला दहावीची परीक्षा द्यायची होती, असे उदाहरण त्यांनी दिले. मृत्यू समोर दिसत असतानाही जगण्याची इच्छा आणि ध्येय जपणाऱ्या व्यक्तींकडून जीवनाचा खरा अर्थ समजतो, असे ते म्हणाले. पॅलिएटिव्ह केअरमध्ये केवळ आजारावर उपचार करणे पुरेसे नसून रुग्णाला भावनिक, मानसिक आणि आध्यात्मिक आधार देणेही महत्त्वाचे आहे. 'आम्ही तुमच्यासोबत आहोत, तुम्हाला एकटे सोडणार नाही,' हा विश्वास रुग्णाला देणे गरजेचे आहे, असे पिंटो यांनी सांगितले. व्यावसायिक कौशल्यासोबतच सहानुभूती आणि माणुसकी जपण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

सध्याच्या विस्कळीत संवादपद्धतीबद्दल चिंता व्यक्त करताना त्यांनी प्रत्यक्ष भेटीतून होणाऱ्या संवादाचे महत्त्व सांगितले. समोरच्या व्यक्तीचे भाव, देहबोली आणि भावना समजून घेण्यासाठी प्रत्यक्ष संवाद आवश्यक आहे. पत्रकारांनीही तज्ज्ञांकडून नम्रतेने शिकून जीवनातून मिळणारे अनुभव आणि धडे आपल्या लेखणीतून मांडावेत, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिल्पाली भालेराव यांनी केले. हरी बाहेती यांनी कार्यक्रमाचे संचालन केले, तर डॉ. श्याम लड्ढा आणि जितेंद्र नायक यांनी जेरी पिंटो यांचे स्वागत केले. यावेळी 'अ गुड लाइफ : द पॉवर ऑफ पॅलिएटिव्ह केअर' या पुस्तकाच्या स्वाक्षरीयुक्त प्रती वाचकांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या.

थोडक्यात

सात महिन्यांनंतर किल्ले कोलारघाट खून प्रकरणाचा छडा! मुख्य आरोपी जेरबंद, साथीदार फरार

दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

कोराडी देहेगाव रंगारी जवळ असलेले किल्ले कोलारघाट परिसरात झोपडीत झोपलेल्या दोन भिक्षेकऱ्यांवर दगडाने प्राणघातक हल्ला करून एकाचा खून केल्याच्या प्रकरणाचा खापरखेडा पोलिसांनी तब्बल सात महिन्यांनंतर छडा लावला आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी अन्वर ऊर्फ बाबू अल्ताफ शेख (वय ३१, रा. गोंदिया) याला अटक करण्यात आली असून, त्याचा एक साथीदार अद्याप फरार आहे. दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या या गुन्ह्याचा उलगडा करण्यात पोलिसांना यश आले आहे. नागपूर येथील प्रशांत वसंता कुंभारे (वय २७) आणि फिरोज शेख हे दोघे भिक्षा मागून उदरनिर्वाह करत होते. ते ताजबाग परिसरात वास्तव्यास होते. फिरोज दिव्यांग असल्याने हे दोघे दरशेज रात्री किल्ले कोलारघाट परिसरातील एका झोपडीत झोपण्यासाठी जात असत.

३० मार्चच्या मध्यरात्री दोघेही झोपेत असताना हल्लेखोरांनी त्यांच्यावर दगडाने भीषण हल्ला केला. या हल्ल्यात प्रशांत कुंभारे गंभीर जखमी झाला,तर फिरोजला किरकोळ दुखापत झाली,उपचार सुरू असताना १२ एप्रिल रोजी प्रशांतचा मृत्यू झाला. या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली होती,पोलिस तपासात समोर आलेल्या माहितीनुसार,अन्वर आणि फिरोज यांच्यात पूर्वीपासून वाद होता,याच वादातून ३० मार्चच्या मध्यरात्री अन्वर फिरोजवर हल्ला करण्यासाठी गेला होता.मात्र,त्याच वेळी शेजारी झोपलेल्या प्रशांतने आरोपींना पाहिल्याने पकडले जाण्याच्या भीतीतून त्यांनी प्रशांतवरही प्राणघातक हल्ला केला,त्यात प्रशांतचा मृत्यू झाला,२० ऑगस्ट रोजी वरिष्ठ पोलिस निरीक्षक म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर संदीप बुवा यांनी या प्रकरणाचा तपासाला गती दिली. पोलिस उपायुक्त रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक माहिती आणि गुप्त माहितीच्या आधारे तपास करण्यात आला,अखेर पोलिसांनी मुख्य आरोपी अन्वर ऊर्फ बाबू अल्ताफ शेख याला अटक केली. या प्रकरणातील दुसऱ्या आरोपीचा शोध सुरू असून,त्याला अटक करण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

अण्णामोडमध्ये दारू दुकान पाडल्याप्रकरणी राहुल तिवारी सह ३१ जणांवर गुन्हे!

दुकानदाराने केला १२ लाखांच्या नुकसानीचा दावा



दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

खापरखेडा अण्णामोड परिसरातील राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या जागेवरील देशी दारूचे दुकान दोन जेसीबींच्या साहाय्याने पाडल्याप्रकरणी खापरखेडा पोलिसांनी सावनेरचे माजी उपसभापती राहुल तिवारी यांच्यासह एकूण ३१ जणांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत,या घटनेत दुकानाचे १२ लाख रुपयांचे नुकसान झाल्याची तक्रार दुकानदाराने केली आहे,फिर्यादी गिरीश मोतीलाल जयस्वाल रा.बेलतरोडी,नागपूर) यांचे अण्णामोड परिसरात देशी दारूचे दुकान आहे,हे दुकान हटविण्याची मागणी स्थानिक पातळीवर अनेक वर्षांपासून केली जात होती. चनकापूर ग्रामपंचायतीने संबंधित दुकानाचा मालमत्ता कर रद्द करून पाणीपुरवठाही बंद केला होता. दरम्यान,दुकान हटविण्याच्या मागणीसाठी राहुल तिवारी यांनी २ ऑक्टोबरपासून बेमुदत उपोषण सुरू केले होते.उपोषणानंतर ८ ऑक्टोबर रोजी दोन जेसीबींच्या साहाय्याने संबंधित दुकान पाडण्यात आले.या घटनेत दुकानाच्या बांधकामाचे १० लाख रुपये,तर दारूचा साठा व इतर साहित्याचे दोन लाख रुपये, असे एकूण १२ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा फिर्यादीने केला आहे.

या प्रकरणी राहुल तिवारी, प्रकाश खापरे,रिंकू ऊर्फ विश्वजित सिंग, हंसराज सुखदेवे, राजेंद्र इंगोले यांच्यासह एकूण ३१ जणांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अविनाश निकाळजे पुढील तपास करीत आहेत.

अनैतिक संबंधाच्या संशयातून तरुणाचा खून

वृत्तसंस्था, निलंगा

निलंगा तालुक्यातील काटेजवळगा येथे अनैतिक संबंधाच्या संशयावरून झालेल्या वादातून २६ वर्षीय तरुणाचा खून झाल्याची घटना शनिवार दि. १७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सातच्या सुमारास घडली. सोहेल गुलाब पठाण(रा. काटेजवळगा) असे मृत तरुणाचे नाव आहे. या घटनेमुळे गावात खळबळ उडाली आहे. सोहेल पठाण यांचे गावातील एका नातेवाईक महिलेशी अनैतिक संबंध असल्याचा संशय होता.



या कारणावरून संबंधित दोन कुटुंबांमध्ये वापूर्वी अनेकदा वाद झाले होते. हा वाद वाढत गेल्यानंतर शनिवारी सायंकाळी सोहेल यांच्यावर बकरे कापण्यासाठी वापरण्यात येणा-या सुं-याने वार करण्यात आल्याची माहिती आहे. या हल्ल्यात सोहेलचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून पुढील तपासाची प्रक्रिया सुरू केली. रात्री उशिरापर्यंत या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस करीत आहेत.

महागौरींच्या स्वरूपा प्रमाणेच, अंर्तबाह्य शुर्चिभुततेची गरज !

शशिकांत तोटे
दारव्हा, जि.यवतमाळ

नवरात्र म्हणजे आदिशक्तीच्या उपासनेचा उत्सव! हा उत्सव केवळ धार्मिक विधी, पूजाअर्चा आणि उपवासापुरता मर्यादित नाही,तर तो मानवी जीवनाला नवी दिशा देणारा संस्कारसोहळा आहे. नवरात्रीच्या आठव्या दिवशी पूजल्या जाणाऱ्या 'महागौरी' देवीचे रूप पावित्र्य, शांती,करुणा आणि निर्मळतेचे प्रतीक मानले जाते. शारदीय नवरात्र उत्सवातील आजच्या आठव्या दिवसाचे रूप म्हणजे महागौरी देवीच्या उपासनेचे पर्व. पुराणपरंपरेच्या कथेनुसार, पार्वतीने शिवाला मिळविण्यासाठी घोर तप केले. झाडाची पाने खाऊन ऊनऊस सहन करून तप पूर्ण केले. तिचे शरीर काळे पडले तेव्हा प्रसन्न होऊन शिवाने गंगाजलाने तिला स्नान घातले आणि ती विजेसारखी तेजस्वी झाली. म्हणून तिचे नाव 'महागौरी' पडले.

महागौरीचे वाहन वृषभ आहे.ती शुभ्र वस्त्र परिधान करणारी आहे. ती चतुर्भुज असून एका हातात त्रिशूल, दुसऱ्या हातात डमरू, तिसऱ्या हातात अभय मुद्रा तर चौथा हात अभयमुद्रेचा आहे.ती स्वभावाने अत्यंत शांत,करुणामय पण दृष्टांचा नाश करणारी आहे. महागौरी प्रमाणेच या देवीला अन्नपूर्णा व शिवाची शक्ती असेही म्हणतात. तिच्या स्वरूपाकडे बघून समाजाला निष्कलंकित व शुचिर्भुत राहण्याचा संदेश मिळतो. याशिवाय महागौरीच्या या स्वरूपातून समाजाला मिळणारा संदेश केवळ आध्यात्मिक नाही,तर सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीनेही महत्त्वाचा आहे.

महागौरी देवीचे शुभ्र रूप मनातील विकार, द्वेष आणि नकारात्मक विचार दूर करण्याची प्रेरणा देते.माणसाचे खरे सौंदर्य त्याच्या बाह्यरूपात नसून त्याच्या विचारांत, आचारांत आणि व्यवहारांत असते. चेहऱ्यावरील प्रसन्नतेपेक्षा मनातील निर्मळता अधिक महत्त्वाची असते. म्हणूनच महागौरीचे पूजन करताना आपल्या मनातील अहंकार,मत्सर, जातिभेद आणि असमानतेची भावना दूर करण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे. मनाची शुद्धता हाच खरा धर्म ठरतो.

आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात माणसाने मोठी प्रगती केली आहे.जग जवळ आले,संवादाची साधने वाढली; मात्र माणसामाणसांतील भावनिक अंतर काही ठिकाणी वाढताना दिसते. समाजात जात, धर्म, भाषा, आर्थिक स्तर आणि विद्वत्तेच्या, प्रतिष्ठेच्या आधारावर भेदभाव केला जातो. माणसाची किंमत त्याच्या कर्तृत्वापेक्षा त्याच्या सामाजिक स्थानावर ठरवली जाते.अशा परिस्थितीत महागौरी देवीची उपासना म्हणजे प्रत्येक व्यक्तीकडे माणूस म्हणून पाहण्याची दृष्टी विकसित करणे होय.

मंदिरातील देवतेसमोर नतमस्तक होणारे आपले मस्तक अन्यायग्रस्त व्यक्तीला मदतीचा हात देण्यासाठीही झुकले पाहिजे. देवाला अर्पण केलेली फुले सुंदर असतात;पण दुःखी माणसाच्या जीवनात आनंद फुलविणारे कार्य त्याहून अधिक सुंदर असते. पूजा करताना मन शुद्ध ठेवण्याइतकेच दैनंदिन व्यवहारातही प्रामाणिकपणा, संवेदनशीलता आणि समतेची भावना जपणे गरजेचे आहे. संपूर्ण नवरात्र उत्सव हा स्त्रीशक्तीचा जागर करणारा उत्सव आहे. अशावेळी समाजातील इतरही स्त्रियांचा आजार व सन्मान होणे उचित ठरते.

महागौरी ही आदिशक्तीचे एक महत्त्वपूर्ण रूप आहे.तिच्या पूजनातून स्त्रीशक्तीचा गौरव केला जातो.परंतु स्त्रीशक्तीचा खरा सन्मान केवळ देवीच्या आराधनेतून नव्हे, तर घरातील आणि समाजातील प्रत्येक स्त्रीला समान अधिकार, सुरक्षितता आणि सन्मान देण्यातून व्यक्त झाला पाहिजे.

एकीकडे देवीला शक्तिस्वरूप मानायचे आणि दुसरीकडे मुलगा-मुलगी असा भेद करायचा,ही विसंगती दूर होणे आवश्यक आहे.गर्भलिंग परिक्षण तिला गर्भातच मारून टाकणे, कर्तव्य अधिकारात दुय्यम स्थान देणे आधुनिक म्हणून घेणाऱ्या आजच्या समाजाला लांच्छनास्पद ठरते. मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे, महिलांना निर्णयप्रक्रियेत समान स्थान देणे, त्यांच्या स्वप्नांना बळ देणे आणि अन्यायाविरुद्ध त्यांच्यासोबत उभे राहणे,हीच स्त्रीशक्तीच्या उपासनेची खरी फलश्रुती आहे.

स्त्री ही केवळ कुटुंबाची जबाबदारी सांभाळणारी व्यक्तीनसून समाजाच्या प्रगतीची महत्त्वपूर्ण भागीदार आहे. तिच्या क्षमतांना संधी मिळाली,तर कुटुंबासह संपूर्ण समाजाचा विकास साधता येतो. त्यामुळे महागौरीचा उत्सव स्त्रीसन्मानाचा संकल्प अधिक दृढ करणारा ठरावा.

स्वच्छ विचार, स्वच्छ समाज!

महागौरीच्या शुभ्रतेचा अर्थ केवळ बाह्य स्वच्छतेपुरता मर्यादित ठेवता कामा नये. मनातील पूर्वग्रह, सामाजिक जीवनातील भ्रष्टाचार, सार्वजनिक व्यवहारातील अप्रामाणिकपणा आणि तिचे व्यक्तिस्वातंत्र्य व माणूस म्हणून जगण्याचा अधिकारांचा विचार करायला हवा.

आपले घर स्वच्छ ठेवताना गावातील रस्ते अस्वच्छ राहणार नाहीत,याची काळजी घेणे आवश्यक आहे. धार्मिक उत्सव साजरे करताना पर्यावरणाचे रक्षण करणे, प्लास्टिकचा वापर टाळणे, पाण्याची बचत करणे आणि सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता राखणे हीसुद्धा सामाजिक जबाबदारी आहे.

त्याचप्रमाणे समाजमाध्यमांवर अफवा पसरविणे, दुसऱ्यांची बदनामी करणे आणि द्वेषपूर्ण संदेश प्रसारित करणे टाळले पाहिजे. शब्दांतील पावित्र्य आणि विचारांतील विवेक जपणे ही आजच्या काळातील मोठी गरज आहे. कारण अस्वच्छता केवळ परिसरात नसते; ती कधी कधी विचारांतही असते.भौतिक जगातील घाण विविध साधनांनी स्वच्छ करता येईल. परंतु मनातील मलीनता स्वच्छ करणे अवघड कार्य पण अशक्य ठरत नाही.

नवरात्रोत्सवात अनेक ठिकाणी धार्मिक कार्यक्रम,भजन,कीर्तन आणि विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. या उपक्रमांना सेवाभावाची जोड दिल्यास उत्सवाचे महत्त्व अधिक वाढेल. गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देणे, निराधारांना मदत करणे, महिलांची आरोग्य तपासणी, शाळा बाह्य मुलींना शिक्षण प्रवेश, तरुणींना व्यवसाय, स्वयं रोजगाराचे मार्गदर्शन, आत्म रक्षणाचे धडे, दुर्बल घटकातील महिला-मुलींना मुख्य प्रवाहाचा हिस्सा बनविण्यास समर्थ करणे, रक्तदान शिबिरे आयोजित करणे, वृक्षारोपण करणे आणि वंचित घटकांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणे,अशा कार्यातून श्रद्धेला सामाजिक अधिष्ठान मिळते. निराश झालेल्याला आशेचे शब्द सांगणे आणि अन्यायाविरुद्ध निर्भयपणे आवाज उठविणे, हीसुद्धा शक्तीचीच रूपे आहेत.अशा कृतींमधून महागौरीच्या पूजनाला खऱ्या अर्थाने सामाजिक आशय प्राप्त होतो.


भारतीय संस्कृतीत सण उत्सव साजरा करण्यामागे पुराण संदर्भाचा आधार, निसर्ग, समाजाप्रति कृतज्ञता व्यक्त करीत असतांना त्यातून समाजास एक सुबोध सुद्धा मिळत असतो. महागौरी देवीचा उत्सव आपल्याला अंतर्मुख होण्याची संधी देतो. सृजनात्मक कार्य करण्यास प्रेरणा देऊन बळ प्रदान करते. दुसऱ्याचा दोषांवर बोट ठेवण्यापूर्वी स्वतःच्या वर्तनाचे परीक्षण करणे, भेदभावाऐवजी बंधुभाव स्वीकारणे आणि स्वार्थऐवजी समाजहिताला प्राधान्य देणे, हीच या उत्सवाची खरी शिकवण आहे. देवीच्या चरणी वाहिलेली फुले काही काळात कोमेजतात;परंतु तिच्या विचारांतून प्रेरित होऊन केलेले सत्कर्म समाजाच्या स्मरणात कायम राहते. महागौरीचे पूजन करताना आपल्या मनातील अंधार दूर करून विवेकाचा दीप प्रज्वलित करूया. स्त्रीसन्मान, सामाजिक समता, पर्यावरणसंवर्धन आणि मानुसकी या मूल्यांचा स्वीकार करूया. कारण देवत्वाचा खरा अनुभव केवळ मंदिरातच नव्हे,तर माणसामाणसांतील प्रेम,विश्वास आणि सहकार्याच्या नात्यांतही मिळतो.

महागौरीचा आशीर्वाद मागताना केवळ स्वतःच्या कल्याणाची प्रार्थना न करता, समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात सुख, सन्मान आणि समान संधींचा प्रकाश पसरविण्याचा संकल्प करूया. हाच महागौरीच्या पूजनातून मिळणारा निर्मळ विचारांचा आणि सामाजिक परिवर्तनाचा खरा जागर ठरतो.

मो. ९१३०८३५४५८

शेतकऱ्यांची दिवाळी काळी : मुंबईत भाजपचा शंभर कोटींचा गरबा!

काँग्रेस प्रवक्ते अतुल लोंढे यांचा प्रहार, मुख्यमंत्र्यांनी प्रदेशाध्यक्ष व मंत्र्यांना करावे निलंबित: लोंढे यांची मागणी



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

ऑक्टोबर २०२६: मुंबईच्या कल्याण-डोंबिवलीत 'नमो रमो रमजत गरबा'चे भव्य- दिव्य आयोजन भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण,मंत्री आशिष शेलार, आमदार अतुल भातकळकर, आ.संजय उपाध्याय, माजी खासदार विनोद शेट्टी व इतर मोठ्या नेत्यांनी केले असून, या रास गरबावर दररोज किमान दीड कोटींचा खर्च होत असून एकीकडे राज्यातील शेतकरी हा दुष्काळात होरपळत असताना सत्ताधारी भाजपचे नेते हे गरबासारख्या आयोजनावर शंभर कोटींचा खर्च करीत असल्याचा घणाघाती आरोप काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी आज पत्रकार परिषदेत केला.

भाजपच्या या अश्या धार्मिक कृत्यामुळे आपण उपासना करीत असलेली देवीच नाराज असेल.एकीकडे राज्यात जनावरांना चारा नाही,पाणी नाही,उभी पिके करपली,यावर मुख्यमंत्र्यांनी फक्त पाच हजार रुपयांची मदत जाहीर करुन शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली. नवरात्रीत देवीची आराधाना ही अंतर्मनातून करावी लागते मात्र,प्रदेशाध्यक्ष रविंद चव्हान ज्या भव्य दिव्य व नेत्रदिपक पॅण्डॉलमध्ये गरबा नृत्य व जेवणावळीवर खर्च करीत आहे त्याचा खर्चच दीड ते दोन कोटी रोजचा असल्याचा आरोप लोंढे यांनी केला. यालाच 'मृताच्या टाळूवरचे लोणी खाणे' म्हणतात आणि भाजप राज्यात सध्या हेच करीत असल्याची टिका त्यांनी केली.

३० कोटी रुपये तर गरबा नृत्यावर खर्च होत असून भाजपकडे पैशांचा महापूर वाहत आहे. विद्युत कमानी, एलईडी स्क्रीन्स, गुजरातमधील सुप्रसिद्ध गायक ज्यांचे मानधन दोन कोटी रुपये एका शो चे आहे,त्यांना आमंत्रित केले जात असून इतर गुजराती गायकांवर पंचवीस ते तीस लाख रुपये खर्च केले जात आहेत. भाजपची भक्ती म्हणजे पैशांची भक्ती असल्याचा आरोप त्यांनी केला.इतकेच नव्हे तर दहा दिवसांचा गरबा २० ऑक्टोबर रोजी दसऱ्याचा दिवशी आटोपल्यानंतर २५-२६ ऑक्टोबर रोजी कोजागिरी आहे, कोजागिरी देखील भाजपचे प्रदेशाध्यक्ष, मंत्री व नेतेगण भव्यदिव्य सोहळ्यातून साजरी करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जवळपास बारा दिवसात ३ लाखांपेक्षा अधिक लोकं भाजपच्या नमो-रमो रास गरब्यात सहभागी होत आहेत. वासाठी ७ हजार फूटांचा भव्य मंच साकारण्यात आला आहे. २० हजार फूटांचा आऊटडोर प्लॅटफॉर्म उभारण्यात आला आहे. मंडपामध्ये दोन हजार टनचे वातानुकुलीन यंत्रे बसवले असून याचा दररोजचा खर्च ६० लाख रुपये आहेत. ध्वनिक्षेपक व प्रकाश योजनेवर दररोज पंचवीस लाखांचा खर्च होत आहे. मंडपामध्ये पंचवीस जनरेटर्स असून त्याचे भाडे साडे सहा लाख रुपये रोज आहेत. सिम्फनी बँण्ड आहे. दररोजच्या फूलांच्या आरासवर तीन ते पाच लाख रुपये खर्च होत आहे. अश्या प्रकारचे गरबाचे आयोजन करुन शेतकऱ्यांच्या जखमांवर मीठ चोळण्याचे काम भाजप करीत असल्याचा आरोप अतुल लोंढे यांनी केला. कांदिवलीमध्ये अतुल भातकळकर तर अशिष शेलार सांताक्रूजमध्ये गरबाच्या आयोजनात दंग आहेत. भाजपवर देवी माता प्रसन्न होईल का? असा सवाल त्यांनी केला. सोयाबिन,तुर,कापूस शेतकरी उधवस्त आहे. दूसरीकडे भाजप प्रदेशाध्यक्ष, मंत्री आशिष शेलार, भातकळकर आदी हे गरबामध्ये दंग आहेत. मुख्यमंत्री भाजप प्रदेशाध्यक्ष व इतर मंत्र्यांना अश्या या उधळपट्टीसाठी जाब विचारणार आहेत का? त्यांची पदावरुन हकालपट्टी करणार आहेत का? असा सवाल त्यांनी केला. आज देवेंद्र फडणवीस, बावणकुळे, आशिष शेलार यांना शेतकऱ्यांच्या बांद्यावर असायला हवे ते विधान परिषदेच्या लहानश्या निवडणूकीत व्यस्त दिसतात. शेतकरी मेला तरी चालेल पण त्यांना निवडणूक महत्त्वाची असल्याचा आरोप त्यांनी केला.

देवाभाऊ हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणांवर नतमस्तक होतात परंतु छत्रपती शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांच्या पिकांच्या प्रत्येक देठाचेही संरक्षण करण्याचे धोरण राबविले होते,दुसरीकडे महाराजांसमोर नतमस्तक होणारेच शेतकऱ्यांची थट्टा चालवित असल्याची टिका त्यांनी केली. पूजा अर्चना सगळेच करतात मात्र, शेतकऱ्यांची थट्टा चालविणाऱ्या भाजप नेत्यांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली.

सीजेपीचे संस्थापक दिपके यांच्या अटकेविषयी छेडले असता, भाजप घाबरलेली असल्याचे ते म्हणाले.२०१९ मध्ये फडणवीसांनी 'महाजनादेश'यात्रा काढली होती त्यावेळी मी दहा प्रश्ने त्यांना विचारणार होतो मात्र, जोपर्यंत त्यांची महाजनादेश यात्रा समाप्त होत नाही, मला घरातच नजरकैद करुन ठेवण्यात आले असल्याचे लोंढे यांनी सांगितले. ते आता ब्रिटीश झाले आहेत आणि आपण गुलाम. या देशात आता तिरंगा फडकवणे हा देखील गुन्हा झाला आहे. संघाने तर त्यांच्या ऑर्गनायझर मासिकेत भारत या देशासाठी तिरंगा स्वीकृत झाल्यावर नाराजी व्यक्त केली होती. संघाच्या मुख्यालयात ५२ वर्षे तिरंगा फडकलाच नाही, अशी टिका त्यांनी केली.

भ्रष्टाचारात संघ बरोबरीचा सहभागी!

काल राष्ट्रसेविका समितीच्या विजयादशमीच्या सोहळ्यात समितीच्या प्रमुख संचालिका शांतक्का यांनी महिलांवर सतत अन्याय होत असल्याचे चित्र सतत रंगवून त्यांना भडकवण्याचे प्रकार घडत असल्याचे विधान केले. महिलांनी कर्तव्याचा विसर पाडून केवळ अधिकारांसाठी लढत राहावे, अशी संकुचित मानसिकता काही घटकांकडून रुजवली जात आहे, असेही ते यावेळी म्हणाले.

शिक्षक समितीच्या संघर्षाला यशाची जोड!

एकस्तर पदोन्नतीच्या प्रश्नाला शासनाच्या मार्गदर्शनाने मिळाली निर्णायक दिशा; आमदार विनोद अग्रवाल यांचे शिक्षक समितीकडून आभार!, शिक्षकांच्या २५ मागण्यांसाठी २९ ऑक्टोबरला भव्य धरणे व सत्याग्रह आंदोलन; निवेदनाची दखल घेत आमदार विनोदभाऊ अग्रवाल यांचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पत्र!



दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा

शिक्षकांच्या न्याय हक्कांसाठी सातत्याने संघर्ष करणाऱ्या महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, गोंदिया जिल्हा शाखेच्या पाठपुराव्याला महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे. सुधारित एकस्तर पदोन्नतीच्या प्रलंबित प्रश्नासंदर्भात दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी शासनाकडून प्राप्त झालेल्या सुस्पष्ट मार्गदर्शनामुळे या प्रश्नाच्या पुढील कार्यवाहीला निर्णायक दिशा मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. या महत्त्वपूर्ण घडामोडीत शिक्षक समितीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांसोबतच आमदार विनोदभाऊ अग्रवाल यांनी केलेल्या प्रभावी पाठपुराव्याची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, गोंदिया जिल्हा शाखेच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार विनोदभाऊ अग्रवाल यांची भेट घेऊन त्यांना आभारपत्र प्रदान केले आणि शिक्षकांच्या प्रश्नांना शासनस्तरावर पाठबळ दिल्याबद्दल मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली.

संघर्ष, पाठपुरावा आणि पुन्हा आशेचा किरण!

शिक्षक समिती गेल्या अनेक महिन्यांपासून दि. २९ फेब्रुवारी २०२४ च्या शासन निर्णयानुसार सुधारित एकस्तर पदोन्नतीचा लाभ सन २००२ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यासाठी प्रयत्नशील आहे. या मागणीच्या पूर्ततेसाठी संघटनेने आंदोलन, निवेदने आणि न्यायालयीन लढ्याच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला आहे.

दि. ६ एप्रिल २०२६ रोजी शिक्षक समितीने एकस्तर पदोन्नतीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी बेमुदत साखळी उपोषण आंदोलन सुरू केले होते. या आंदोलनात आमदार विनोदभाऊ अग्रवाल स्वतः सहभागी झाले होते. आंदोलनस्थळावरूनच त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून शिक्षकांची मागणी तातडीने मार्गी लावण्याची भूमिका मांडली होती. या आंदोलनानंतर दि. २१ एप्रिल २०२६ रोजी मागणीसंदर्भात सकारात्मक निर्णय झाला; मात्र संबंधित आदेश रद्द झाल्याने हा प्रश्न पुन्हा प्रलंबित राहिला. त्यानंतरही शिक्षक समितीने हार न मानता विविध स्तरांवर पाठपुरावा सुरू ठेवला.

आमदार विनोदभाऊ अग्रवाल यांच्या पाठपुराव्याला यश

जुलै महिन्यात थकबाकी आणि स्थगितीच्या प्रश्नावर न्यायालयीन लढ्याची दिशा निश्चित करण्यात आली. सप्टेंबर महिन्यात शिक्षक समितीच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार विनोदभाऊ अग्रवाल यांची भेट घेऊन या प्रश्नात शासनस्तरावर हस्तक्षेप करण्याची मागणी केली. शिक्षक समितीच्या निवेदनाची गांभीर्याने दखल घेत आमदार अग्रवाल यांनी ग्रामविकास मंत्री आणि संबंधित सचिव यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला.